cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२७ | बुधवार दि.१५ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सौम्य धक्के, गंभीर संकेत भूकंपाने वाढवली चिंता !

विदर्भ आणि मराठवाडा परिसर शनिवारी सकाळी सौम्य ते मध्यम तीव्रतेच्या भूकंपधक्क्यांनी हादरला आणि नागरिकांच्या मनात भीतीचे सावट निर्माण झाले. वाशिम, यवतमाळमधील पुसद तालुका, नांदेड, हिंगोलीतील पांगरा शिंदे यांसारख्या ठिकाणी जाणवलेले हे धक्के केवळ क्षणिक नव्हते; तर त्यांनी या प्रदेशाच्या भूकंपीय वास्तवाची पुन्हा एकदा जाणीव करून दिली. रिश्टर स्केलवर ४.७ तीव्रतेची नोंद झालेला हा भूकंप गेल्या काही वर्षांत वाढत चाललेल्या भूकंपांच्या मालिकेतील एक महत्त्वाचा दुवा ठरत आहे.

# खत खरेदीसाठी फार्मर आयडी बंधनकारक?

पुणे । प्रतिनिधी

**खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने अनुदानित रासायनिक खतांच्या विक्रीसाठी 'फार्मर आयडी' बंधनकारक करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. 'अ‍ॅग्रीस्टॅक' प्रणालीअंतर्गत शेतकरी ओळख क्रमांकावर आधारित ही अंमलबजावणी लवकरच सुरू होण्याची शक्यता असून, खत विक्रीत पारदर्शकता आणण्याचा सरकारचा उद्देश आहे. मात्र, या निर्णयामुळे अद्याप नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. ऐन खरीप हंगामात खतांपासून वंचित राहावे लागू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.**




केंद्र सरकारने राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत निधी देताना दोन नवीन अटी लागू केल्या आहेत. त्यापैकी एक अट म्हणजे खतांच्या वापरास 'अ‍ॅग्रीस्टॅक'वरील फार्मर आयडीशी जोडणे. त्यामुळे राज्य सरकारांकडून या निर्णयाला पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. फार्मर आयडीचा डेटा राज्य सरकारांकडे उपलब्ध असल्याने अंमलबजावणी सुलभ होईल, असे मानले जात आहे. दरम्यान, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी अलीकडेच खतांच्या गैरवापराबाबत चिंता व्यक्त करताना फार्मर आयडी प्रणालीचा उल्लेख केला. अनुदानित खतांचा वापर अनेकदा औद्योगिक किंवा बिगरशेती ▶▶ पान २ वर

### अ‍ॅग्रीस्टॅक प्रणाली काय आहे?

अ‍ॅग्रीस्टॅक ही एक डिजिटल प्रणाली आहे, यामध्ये शेतकऱ्यांची आणि शेतीची माहिती संगणकावर साठवली जाते. गावांचे नकाशे, शेतात घेतलेल्या पिकांची माहिती आणि शेतकऱ्यांची नोंद एकत्र ठेवली जाते. त्यामुळे सरकारला अचूक माहिती मिळते. या प्लॅटफॉर्मचा फायदा असा होतो की, एकाच व्यक्तीला दोनदा अनुदान मिळण्याचे प्रकार कमी होतात आणि अनुदान योग्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचते. तसेच संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि व्यवस्थित होते.

# महामानवाला अभिवादन;चैत्यभूमीवर लोटला भीमसागर

## मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वंदन

मुंबई । प्रतिनिधी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाला आपण जेवढे अभिवादन करू तेवढे कमी आहे. महामानवाने संविधान लिहिले आणि देश बदलवला, सर्व भेद संपवले. तसेच सर्व भेद संपवण्याचे काम संविधानाने केले आहे. भारत प्रगती करत आहे कारण भारताला सर्वाधिक चांगले संविधान दिले आहे. जगात सर्वांत मोठ्या प्रमाणात जयंती कोणाची होत असेल तर ती बाबासाहेब आंबेडकर यांची होते.**

भगवान बुद्ध यांनी 'अत् दीप भव:' हा संदेश दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या अर्थकारणाला जी दिशा




दिली ती सर्वांत महत्त्वाची आहे. भारतात एक सेंट्रल बँक असली पाहिजे, असे बाबासाहेब यांनी सांगितले होते. आपल्या चलनाचे सिल्व्हर कोट संपवून गोल्डन कोट सुरू केले पाहिजे, म्हणून रिझर्व्ह बँक स्थापन झाली. याची मूळ कल्पना ही बाबासाहेब यांची होती. असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती महोत्सव दिनानिमित्त दादरच्या चैत्यभूमी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलताना सांगितले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेचे निर्माते होते, तसेच ते माणुसकीचेही निर्माते होते. त्यांनी प्रथम निवडणूक लढवली त्यात त्यांचे ▶▶ पान २ वर

# अशोक खरातची पुन्हा पोलिस कोठडीत रवानगी

## गुंगीच्या औषधावरून सरकारी वकिलांचा जोरदार युक्तिवाद

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. तिस-या गुन्ह्यातील पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर, आज अशोक खरातला 'व्हीडीओ कॉन्फरन्सिंग'द्वारे नाशिक जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खरातला १८ एप्रिलपर्यंत (५ दिवस) पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.



सुरक्षेच्या कारणास्तव अशोक खरातला आज प्रत्यक्ष न्यायालयात न आणता 'व्हीडीओ कॉन्फरन्सिंग'द्वारे हजर करण्यात ▶▶ पान २ वर

# संगिता कुऱ्हाडे खून प्रकरण पतीसह पाच जणांना जन्मठेप

## बीड पोलिसांच्या शास्त्रशुद्ध तपासाला यश; सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

बीड । प्रतिनिधी

विवाहित महिलेचा खून करून पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह जाळून विहिरीत फेकल्याच्या धक्कादायक प्रकरणात बीड सत्र न्यायालयाने पाच आरोपींना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. जिल्हा न्यायाधीश आनंद एल. यावळकर यांनी सेशन केस क्र. १३१/२०१६ मध्ये हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.

मयत महिला संगिता एकनाथ कुऱ्हाडे हिचा खून करून, तिचा मृतदेह जाळून विहिरीत फेकून देण्यात आला होता. या गुन्ह्यात आरोपींनी पुरावा नष्ट करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला होता. तत्कालीन तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप तेजनकर यांनी या प्रकरणाचा अत्यंत बारकाईने तपास केला. त्यांनी संकलित केलेले शवविच्छेदन अहवाल, फॉरेन्सिक पुरावे आणि घटनास्थळावरील भौतिक पुराव्यांच्या आधारे न्यायालयात भक्कम दोषारोपपत्र सादर केले होते. न्यायालयाने भारतीय दंड संहिता कलम ३०२, २०१ सह ३४ अंतर्गत आरोपींना दोषी ठरवले आहे. यामध्ये एकनाथ चंद्रभान कुऱ्हाडे, चंद्रभान ▶▶ पान २ वर

# मराठी येत नाही मग लायसन्स रद्द

## १ मे पासून निर्णय अमलात–मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई । प्रतिनिधी

**येत्या १ मे, महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे आवश्यक करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.**



मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ▶▶ पान २ वर

# मुख्यमंत्री फडणवीसांना महाराष्ट्राचा कारभारही झेपेना–हर्षवर्धन सपकाळ

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईतच नाही तर राज्याच्या कानाकोपऱ्यात ड्रग्जचा काळा धंदा सरकारच्या आशीर्वादाने सुरू असून, भाजपा महायुतीच्या निर्लज्ज व नालायक सरकारमुळेच महाराष्ट्राची तरुण पिढी ड्रग्जच्या विळख्यात अडकली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना गृहमंत्रालयाचा कारभार झेपत नसल्याने त्यांनी राजीनामा देत खुर्ची रिकामी करावी असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

मुंबईतील गोरेगावच्या नेस्को संकुलातील लाईव्ह म्युझिक कॉन्सर्टमध्ये दारू व ड्रग्जचा खुलेआम वापर करण्यात आला. ड्रग्जमुळे दोघांचा मृत्यू होईपर्यंत पोलिस व सरकारी यंत्रणा झोपल्या होत्या, आता कारवाईचे नाटक सुरू आहे पण मुंबईतील एका भागात चार ते पाच हजार तरुणांची ड्रग्ज ▶▶ पान २ वर

# तडजोडीत मान्य केलेली घटस्फोटाची संमती नंतर मागे घेता येत नाही !

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

परस्पर संमतीने घटस्फोट घेताना एकदा सर्व वादांवर पूर्ण आणि अंतिम तडजोड झाली की, त्यानंतर पती किंवा पत्नीला आपली संमती मागे घेता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. कायदेशीर तडजोडीनंतरही अटींचे उल्लंघन करणाऱ्या आणि प्रक्रियेचा गैरवापर करणाऱ्या पत्नीवर न्यायालयाने यावेळी तीव्र शब्दांत ताशेरे ओढले.

दाम्पत्याचा विवाह २००० मध्ये झाला होता. २०२३ मध्ये पतीने घटस्फोटासाठी अर्ज केला. कौटुंबिक न्यायालयाने हे प्रकरण मध्यस्थी ▶▶ पान २ वर




## थोडक्यात...

### दिवाळखोर पाकला जुनी कर्ज फेडण्याचा आदेश

इस्लामाबाद: संयुक्त अरब अमिरातीने पाकिस्तानकडून ३.५ अब्ज डॉलर्स तात्काळ परत करण्याची मागणी केली आहे, यामुळे पाकिस्तानच्या परकीय चलन साठ्यावर दबाव आला आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी, पाकिस्तान आर्थिक संकट टाळण्यास मदत व्हावी म्हणून कर्ज आणि गुंतवणूक या दोन्हींसाठी सौदी अरेबिया आणि चीनसोबत वाटाघाटी करत आहे. संयुक्त अरब अमिरातीने काही दिवसापूर्वी पाकिस्तानकडे आपल्या पैशांची मागणी केली आहे. पाकिस्तानला या महिन्यात सौदी अरेबियाला ३.५ अब्ज डॉलर्स परत करायचे आहेत. जर पाकिस्तानने हे पैसे परत केले, तर काही दिवसांतच त्याचा परकीय चलन साठा संपुष्टात येईल.

### महिला आरक्षण विधेयक ही काळाची गरज– अमित शहा

दिल्ली: महिला आरक्षण विधेयक ही केवळ औपचारिकता नसून ती काळाची गरज आहे. हा एक असा ऐतिहासिक बदल आहे, जो कोणत्याही विलंबाशिवाय चांगल्यासाठीच व्हायला हवा, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी केले. संसदेच्या आगामी विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी सर्व राजकीय पक्षांना या महत्त्वाच्या निर्णयाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेने नारी शक्ती वंदन अधिनियम मंजूर केला, ज्याद्वारे लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित करण्याची तरतूद करण्यात आली. मात्र, मूळ कायद्यानुसार हे आरक्षण २०२७ ची जनगणना आणि त्यानंतरच्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर, म्हणजेच साधारण २०३४ पूर्वी लागू होणे कठीण होते.

### इराण–भारतामध्ये सकारात्मक चर्चा

नवी दिल्ली: मध्य पूर्व आशियातील तणाव शिगेला पोहोचला असतानाच एक मोठी बातमी समोर आली आहे. भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी इस्रायलचे परराष्ट्र मंत्री गिदोन साआर यांच्याशी फोनवरून चर्चा केली. पश्चिम आशियातील सध्य स्थिती आणि त्यासंदर्भातील विविध पैलूंवर या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. यासंदर्भात स्वत: एस. जयशंकर यांनी एक्सवर पोस्ट करून माहिती दिली. इस्रायलचे परराष्ट्र मंत्री गिदोन साआर यांनी जयशंकर यांच्याशी लेबनॉन, इराण आणि विशेषत: स्ट्रेट ऑफ होर्मुजमधील तणावासंदर्भात सविस्तर चर्चा केली. यावेळी साआर यांनी इस्लामाबाद चर्चेत अमेरिकेने मांडलेल्या कडक अटींचेही समर्थन केले. इराणला अण्वस्त्रे मिळवण्यापासून रोखण्यासाठी (इराणमध्ये युरेनियमचे कोणतेही संवर्धन न करणे आणि समृद्ध युरेनियम सामग्री देशाबाहेर हलवणे) या अटी आंतरराष्ट्रीय समुदायासाठी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### नितीश कुमारांचा राजिनामा, सम्राट चौधरी नवे मुख्यमंत्री

पाटणा: नितीश कुमारांनी मंगळावारी (दि.१४) मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. यानंतर भाजप आमदारांच्या विधिमंडळ नेतेपदी सम्राट चौधरी यांची एकमताने निवड झाली आहे. त्यामुळे आता सम्राट चौधरी हे बिहारचे पुढचे मुख्यमंत्री असतील, हे स्पष्ट झाले आहे. पाटणा येथे केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजप विधिमंडळ पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१३ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १७८.५० क्विंटल | १,९४० | २,९०० | २,२७८ |
| ज्वारी/हायब्रिड: २०३.५० क्विंटल | १,८०० | ५,१०१ | २,९१४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १९.५० क्विंटल | ७,२०० | ७,४०० | ७,३०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ११३.०० क्विंटल | २,३६१ | २,९०१ | २,५६७ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,४०१ | ५,१५० | ४,७७५ |

# १०२ संवर्गातील पदांची लोकसेवा आयोगाकडून भरती

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारच्या विविध पदांवरील भरती प्रक्रिया सुटसुटीत, सक्षम आणि उमेदवारांच्या दृष्टीने सुलभ व्हावी, यासाठी पदभरती प्रक्रियेत सुधारणा करण्यास सोमवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या सुधारणेमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या १०२ होणार आहे तर संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्याने १८ सेवांचा आणि ९३ संवर्गाचा समावेश होणार आहे. या सुधारणांमुळे सेवाप्रवेश नियमांमध्ये मोठे बदल होणार असून सेवांतर्गत पदोन्नतीसाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली जाणार आहे.**

विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटनुसार भरती प्रक्रियेचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. राज्य प्रशासन अनेक संवर्गांमध्ये विभागलेले असून यात ३३ विभागातील सुमारे ११० आस्थापनांमध्ये ३ हजार ६०० हून अधिक संवर्ग आहेत. या संरचनेत सरळसेवा भरतीसंदर्भात १ हजार ४०० हून अधिक सेवाप्रवेश नियम आहेत. यातून विविध विभागांमधून स्वतंत्रपणे तितक्याच परीक्षा घेण्यात येत होत्या. आता त्याऐवजी परीक्षांची संख्या कमी होऊन उमेदवारांसाठी भरतीच्या पदांची संख्या वाढणार आहे.या निर्णयानुसार सेवाप्रवेश नियमांमध्ये व्यापक बदल होऊन विविध संवर्गांच्या ५७४ सेवाप्रवेशांचे नियम बदलणार आहेत. यामध्ये शैक्षणिक पात्रता, अनुभव, कौशल्ये आणि प्राधान्य निकषांचे सुसूत्रीकरण यांचा समावेश असून विविध संवर्गातील विसंगती दूर करण्यात येणार आहेत. समान स्वरूपाच्या संवर्गासाठी वेगवेगळ्या अनुभवाच्या अटी असल्याने परीक्षांची संख्या अनावश्यकरीत्या वाढत होती. त्यामुळे शैक्षणिक आणि अनुभव निकष अधिक सामायिक, सुसंगत आणि तर्कसंगत करण्यात येणार आहेत.यापुढे सर्वसाधारणपणे सरळसेवा भरतीसाठी अनुभवाची अट लागू राहणार नाही. महाराष्ट्र नागरी सेवा, ▶▶ पान २ वर

### आणखी १८ नवीन सेवा निर्माण करणार

नवीन सेवा–संयुक्त परीक्षांच्या आयोजनात सुसूत्रीकरण करण्यात येणार असून विविध प्रशासकीय विभागातील समान संवर्गांच्या वर्गीकरणाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरती केल्या जाणा–या सध्याच्या सेवांव्यतिरिक्त आणखी १८ नवीन सेवा निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### काही पदे पदोन्नतीने भरणार

नामनिर्देशनाच्या कोट्यातील काही राजपत्रित संवर्गातील पदे मुलाखतीने भरण्याऐवजी अंतर्गत पदोन्नती आणि प्रतिनियुक्तीने भरण्यात येणार आहेत. प्रशासकीय कामकाज आणि शासकीय व्यवहारात माहिती–तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढला आहे. या पार्श्वभूमीवर काही संवर्गांची कर्तव्ये आणि जबाबदा–या आता कालबा ठरल्या आहेत. त्यामुळे प्रशासकीयदृष्टया अनावश्यक ठरलेल्या संवर्गांना कालबा संवर्ग म्हणून घोषित करण्यात येणार आहे.

cmyk

## अग्रलेख

# सौम्य धक्के, गंभीर संकेत : भूकंपाने वाढवली चिंता !

विदर्भ आणि मराठवाडा परिसर शनिवारी सकाळी सौम्य ते मध्यम तीव्रतेच्या भूकंपधक्क्यांनी हादरला आणि नागरिकांच्या मनात भीतीचे सावट निर्माण झाले. वाशिम, यवतमाळमधील पुसद तालुका, नांदेड, हिंगोलीतील पांगरा शिंदे यांसारख्या ठिकाणी जाणवलेले हे धक्के केवळ क्षणिक नव्हते; तर त्यांनी या प्रदेशाच्या भूकंपीय वास्तवाची पुन्हा एकदा जाणीव करून दिली. रिश्टर स्केलवर ४.७ तीव्रतेची नोंद झालेला हा भूकंप गेल्या काही वर्षांत वाढत चाललेल्या भूकंपांच्या मालिकेतील एक महत्त्वाचा दुवा ठरत आहे.

१९९३ मधील किल्लारी भूकंपाच्या भयावह आठवणी आजही मराठवाड्याच्या सामूहिक स्मृतीत जिवंत आहेत. त्या पार्श्वभूमीवर सध्याचे धक्के ''इशारा'' म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. तज्ज्ञांनी व्यक्त केलेली मोठ्या भूकंपाची शक्यता नाकारता येत नाही, ही बाब चिंताजनक आहे. विशेषतः हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वाशिम या भागांत वाढलेली भूकंपीय हालचाल प्रशासन आणि वैज्ञानिक संस्थांसाठी अभ्यासाचा गंभीर विषय ठरली पाहिजे. भूकंप हा निसर्गाचा अविभाज्य भाग असला, तरी त्यातून होणारे नुकसान मोठ्या प्रमाणावर मानवी दुर्लक्षामुळे वाढते. मराठवाड्यात अजूनही मोठ्या प्रमाणावर माती व दगडांच्या पारंपरिक घरांचे प्रमाण आहे. अशा बांधकामांना भूकंपाच्या धक्क्यांचा सर्वाधिक फटका बसतो. याउलट, भूकंपरोधक तंत्रज्ञान वापरून उभारलेली बांधकामे तुलनेने सुरक्षित राहतात. त्यामुळे आता तरी ग्रामीण भागातही भूकंपरोधक बांधकामाचे तंत्र अनिवार्य करण्याची वेळ आली आहे. शासनाने यासाठी आर्थिक मदत, तांत्रिक मार्गदर्शन आणि सक्तीची अंमलबजावणी या तिन्ही पातळ्यांवर काम करणे गरजेचे आहे. या भूकंपाच्या कारणांचा विचार करताना भूगर्भातील पाण्याची पातळी, पर्जन्यमानातील बदल, भौगोलिक रचना आणि सूक्ष्म भूगर्भीय हालचाली यांचा एकत्रित अभ्यास आवश्यक आहे. हैदराबादसारख्या केंद्रांतील भूकंपशास्त्र संस्थांच्या मदतीने सखोल सर्वेक्षण केल्यास भविष्यातील धोके अधिक अचूकपणे ओळखता येतील. विशेषतः हिंगोली परिसरात प्रस्तावित असलेल्या महत्त्वाच्या वैज्ञानिक प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर हा अभ्यास अधिकच महत्त्वाचा ठरतो. भूकंपाचे आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे सामाजिक पातळीवर निर्माण होणारे दुष्परिणाम. पांगरा शिंदे गावाच्या बाबतीत समोर आलेली विवाहासंदर्भातील समस्या ही केवळ अफवा नाही, तर ग्रामीण समाजातील असुरक्षिततेचे प्रतिबिंब आहे. सतत भूकंपाचे धक्के बसणाऱ्या भागात नातेसंबंध टाळले जात असल्याची चर्चा ही चिंताजनक आहे. परिणामी, अनेक तरुण विवाहाच्या प्रतीक्षेत राहणे ही एक नव्याने उद्भवलेली सामाजिक समस्या बनत आहे. नैसर्गिक आपत्तीचे असे सामाजिक परिणामही प्रशासनाने लक्षात घेणे आवश्यक आहे. भूकंपानंतर सोशल मीडियावर पसरणाऱ्या अफवा हीदेखील एक मोठी समस्या आहे. वैज्ञानिकदृष्ट्या अजूनही भूकंपाची अचूक पूर्वसूचना देणे शक्य नाही. त्यामुळे कोणत्याही अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवण्यापेक्षा अधिकृत स्त्रोतांवरच अवलंबून राहणे गरजेचे आहे. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहणे, तसेच आपत्कालीन परिस्थितीत काय करावे याचे प्राथमिक प्रशिक्षण घेणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रात कोयना-वारणा पट्टा भूकंपप्रवण असल्याचे पूर्वीपासून ज्ञात आहे; मात्र आता मराठवाडा आणि विदर्भातील काही भागही त्या यादीत समाविष्ट होत असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने या भागांसाठी स्वतंत्र आणि दीर्घकालीन धोरण आखणे गरजेचे आहे. एकंदरीत, विदर्भमराठवाड्यातील अलीकडील भूकंपधक्के हे केवळ नैसर्गिक घटना नसून ते एक गंभीर इशारा आहेत. वैज्ञानिक अभ्यास, भूकंपरोधक बांधकाम, जनजागृती आणि सामाजिक समस्यांवर उपाय या चारही अंगांनी तातडीने काम केल्यास भविष्यातील संभाव्य मोठ्या संकटाला सामोरे जाणे शक्य होईल. निसर्गाचे संकेत वेळेवर ओळखून त्यानुसार पावले उचलली, तरच नुकसान टळता येईल; अन्यथा इतिहासाची पुनरावृत्ती होण्याचा धोका कायम राहील.



बीडः माहमानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष बीड जिल्हयाच्या वतीने बीड शहरातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, समवेत तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, नुतन इंग्लिश स्कूल चे संचालक जमील बागवान .




## श्री.नरसिंह शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप आणि वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आल्या वेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक गोपाळराव तांबडे अध्यक्ष नरहारी गदळे ईंग्रजी सांगळे हरिदास तांबडे सचिव धनंजय गदळे वसंतराव तांबडे सर वैजनाथ ऊगलमगले सरपंच मच्छिंद्र सांगळे गायकवाड अशोक तांबडे गोविंदराव सहशिक्षक महारूद्र तांबडे सहशिक्षक बबनराव गायकवाड पत्रकार जयद्रथ गायकवाड महादेव गायकवाड ईतर बहुसंख्य मान्यवरांसह ईतर सर्वच शिक्षकांसह मान्यवर नागरिक कांची यावेळी समयोचित भाषणे झाली संस्थेच्या या कार्यक्रमाची सर्वांनीच स्तुती केली.संस्थेतर्फे व्यंगचित्रकार धनंजय गदळे यांनी सर्वांचेच अभार व्यक्त करत सर्वांच्याच व परमेश्वराच्या आशीर्वादाने या संस्थेस अपंग,गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी उपेक्षित पिडीतांसाठी संस्थेने कामकाजासाठी बळ मिळो.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीपूर्वी स्वच्छता मोहीम व दीपोत्सव उत्साहात



**माजलगांव । प्रतिनिधी**

**पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महा अभियानांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला स्वच्छता मोहीम व दीपोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात स्वच्छता मोहिमेने करण्यात आली. सहभागी कार्यकर्त्यांनी परिसरातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ करून स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले. त्यानंतर सायंकाळी दीपोत्सव साजरा करून डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. दिव्यांच्या प्रकाशात परिसर उजळून निघाला आणि वातावरणात उत्साहाचे व सामाजिक एकतेचे दर्शन घडले. या उपक्रमात ज्ञानेश्वर मेंडके, दीपक मुंडे माऊली सरवदे, रूपालीताई कचरे, अभिजीत सोळंके, विनायक रत्नपारखी अनंता जगताप भरत जोशी, कैलास खुरपे, रवि गायकवाड, किशोर विभुते विमलबाई डोंगरे, भीमराव डोंगरे, योगेश सोळंके, लखन अलझेंडे, सुनील अलझेंडे, अमोल अलझेंडे, विजय सुतार, भरत भिसे, आकाश गालफाडे, रोहित सकट आणि करण अलझेंडे यांनी सक्रिय सहभाग घेतला.या उपक्रमामुळे सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होण्यास मदत झाली असून, स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्याचा उद्देश यशस्वी झाल्याचे आयोजकांनी सांगितले.



## 'शेतकऱ्यांचे बाबासाहेब' पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

**माजलगाव । प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी येथील श्रावस्ती बुद्ध विहार येथे सामाजिक कार्यकर्ते, लेखक पुरुषोत्तम जाधव लिखित 'शेतकऱ्यांचे बाबासाहेब' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा दि १४ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी ११:३० वाजता उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषी-आर्थिक दृष्टिकोनावर प्रकाश टाकणारे हे पुस्तक ग्रामीण महाराष्ट्रात चांगलीच चर्चा निर्माण करत आहे.**

या कार्यक्रमाचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी बाबुराव पोटभरे,प्रा.अर्जुन तनपुरे,तुकाराम येवले,श्रीहरी मोरे, कचरू खळगे,डॉ. श्रीराम खळगे,एड. भानुदास डक, दिलीप धुमाळ, नारायण झोडगे, सदाशिव भालेराव तसेच सदधम्म सेवा संघ व मराठा सेवा संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिजाई प्रकाशन, पुणे यांनी हे पुस्तक प्रकाशित केले आहे. उपस्थित मान्यवरांनी हे पुस्तक ग्रामीण भागातील वाचकांसाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगत लेखकाचे अभिनंदन केले. बाबासाहेबांच्या विचारांना नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे हे कार्य महत्त्वाचे असल्याचे मत उपस्थितांनी यावेळी व्यक्त केले. श्रावस्ती बुद्ध विहाराच्या विश्वस्त व पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीरित्या केल्याबद्दल लेखक पुरुषोत्तम जाधव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# संघटित शक्तीशिवाय सरकार शेतकऱ्यांच्या पदरात काहीच टाकत नाही-कॉ.अजय बुरांडे

## सादोळा येथे अखिल भारतीय किसान सभेचे २४ वे तालुका अधिवेशन उत्साहात संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांचे संघटन प्रभावी असल्याशिवाय व एकजुटीने संघर्ष केल्याशिवाय सरकार शेतकऱ्यांच्या पदरात काहीच टाकत नाही. म्हणूनच किसान सभा राज्य पातळीवर नेहमीच संघर्षाच्या भूमिकेत राहून शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांवर ठामपणे काम करत आहे.ऊस दराचा प्रश्न असो की पीक विम्याचा किसान सभा नेहमीच यशस्वी आंदोलन करत आली आहे, बीड जिल्हा मागील अनेक दशके किसान सभेच्या नेतृत्वाखाली तात्विक विचाराने झगडत असल्यामुळेच शेतकरी चळवळ आजही खऱ्या अर्थाने जिवंत आहे, असे ठाम प्रतिपादन किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष कॉ.अजय बुरांडे यांनी केले.ते किसान सभेच्या २४ व्या तालुका अधिवेशनात बोलत होते अध्यस्थानी ऊसतोड कामगार नेते कॉ.दत्ता डाके होते.व्यासपिठावर जेष्ठ नेते कॉ.मुसद्दीक बाबा व उदघाटक शेतीनिष्ठ पुरस्कार विजेते अण्णासाहेब जगताप उपस्थित होते.**

माजलगाव तालुक्यातील मौजे सादोळा येथील गॅलक्सी इंग्लिश स्कूलमध्ये दि १३: एप्रिल सोमवार रोजी अखिल भारतीय किसान सभेचे २४ वे तालुका अधिवेशन मोठ्या उत्साहात पार पडले अधिवेशनाची सुरुवात दि १४ एप्रिल रोजी सकाळी १२:०० वाजता ध्वजारोहणाने करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रगतशील शेतकरी तथा शेतीनिष्ठ पुरस्कार विजेते अण्णासाहेब जगताप यांच्या हस्ते झाले.या सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ ऊसतोड कामगार नेते कॉ. दत्ता डाके होते.या प्रसंगी व्यासपीठावर जेष्ठ नेते कॉ.मुसद्दीक बाबा सर किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे, मा.क.प.तालुका सचिव कॉ. शिवाजीराव कुरे,आदींची प्रमुख उपस्थिती होती.शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर मंथन कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात तालुकाध्यक्ष कॉ. कृष्णा सोळंके यांनी प्रास्ताविक केले. उद्घाटक अण्णासाहेब जगताप यांनी आपल्या मार्गदर्शनात शेतीपुढील आव्हाने मांडली, तर माकप च्या वतीने कॉ.शिवाजी कुरे, डी.वाय.एफ चे नांदे जनवादी महिला वतीने स्वाती सक्राते व शेतमजूर युनियनच्या सौ.उषा यांनी किसनसभेच्या शेतकरी अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. या अधिवेशनात जिल्हाध्यक्ष कॉ. बुरांडे यांनी मागील काही वर्षांत किसान सभेने बीड जिल्ह्यात सक्रिय राहून पीक विमा आणि ऊस दरासारख्या अनेक मागण्या कशा प्रकारे मान्य करून घेतल्या, याचा आढावा घेतला. अध्यक्षीय समारोप करताना कॉ. दत्ता डाके यांनी कामगार आणि शेतकऱ्यांच्या एकजुटीवर भर दिला. दुसऱ्या सत्रामध्ये तालुका सचिव कॉ. अशोक डाके यांनी मागील तीन वर्षांच्या कार्याचा सविस्तर अहवाल सभागृहासमोर मांडला. या अधिवेशनात प्रामुख्याने खालील ठराव मंजूर करण्यात आले.पीक विम्याच्या थकीत प्रश्नांची शासनाने तातडीने सोडवणूक करावी ऊसाच्या दरात किफायतशीर वाढ करण्यात यावी.कापूस व सोयाबीनचा उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळावा.शेतकऱ्यांची सरसकट संपूर्ण कर्जमाफी करावी आदी ठराव या अधिवेशनात मंजूर करण्यात आले. किसान सभेच्या तालुका अध्यक्षपदी कॉ.अशोक डाके यांची निवड या अधिवेशनात आगामी तीन वर्षांसाठी किसान सभेची माजलगाव तालुका कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी कॉ. अशोक डाके तर सचिवपदी कॉ. कृष्णा सोळंके या अधिवेशनात वरील दोघांसह कॉ. राजेंद्र तौर, कॉ. जनक तेलगड, कॉ. गजानन जाधव, कॉ. सुदर्शन हिवरकर, कॉ. विकास थेटे, कॉ. गणेश कदम, कॉ. बंडू गरड, कॉ. अरुण गरड, कॉ. दत्ता बादाडे, कॉ. रावसाहेब बेद्रे, कॉ. बाबा सर, कॉ. शिवाजी राऊत, कॉ. प्रकाश नाना सादोळकर, कॉ. आसाराम राठोड, कॉ. दत्ता पवार, कॉ. रामभाऊ राऊत, कॉ. दत्ता घुले, कॉ. रामचंद्र चिंचाणे, कॉ. दत्ता कचरे आणि कॉ. नितीन पवार.यांची माजलगाव तालुका किसानसभा कार्यकारिणी पदी निवड झाली. या अधिवेशनास तालुक्यातील शेतकरी आणि किसान सभेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पान १ वरून...

### खत खरेदीसाठी फार्मर

कामांसाठी होत असल्याचे त्यांनी नमूद केले. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याची जमीन, पिकांचा तपशील आणि कौटुंबिक माहिती एका आयडीशी जोडण्याची योजना तयार करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशभरात आतापर्यंत सुमारे ९.२९ कोटी शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात आला आहे. तरीही ४ ते ५ कोटी शेतकरी अद्याप नोंदणीपासून दूर आहेत. राज्यातही १ कोटी २९ लाख शेतकऱ्यांनी आयडी घेतला असला तरी ३० ते ३५ लाख शेतकरी नोंदणीपासून वंचित आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांना खत मिळणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सरकारच्या मते, फार्मर आयडीमुळे खतांच्या बनावट नोंदी, गळती आणि काळाबाजारावर नियंत्रण मिळवता येईल. भविष्यात खत खरेदी करताना शेतकऱ्यांना फार्मर आयडी सादर करणे आणि पडताळणी करणे अनिवार्य होण्याची शक्यता आहे. तसेच नोंदी आणि गरजेनुसारच खतांचे वितरण केले जाईल. एकीकडे पारदर्शकतेसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असला, तरी दुसरीकडे अपूर्ण नोंदणीमुळे शेतकऱ्यांची कोंडी होणार नाही ना, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

------------

### अशोक खरातची पुन्हा

आले. सुरुवातीला तांत्रिक अडचणीमुळे न्यायालयाचा आवाज खरातपर्यंत पोहोचत नसल्याने सुनावणी काही काळ थांबवावी लागली होती. तांत्रिक बिघाड दूर झाल्यानंतर सुनावणी पुन्हा सुरू झाली. न्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना खरातने पोलिसांनी मारहाण केली नसल्याचे स्पष्ट केले.सरकारी वकील ॲड. शैलेंद्र बागडे यांनी न्यायालयात खरातच्या गुन्ह्याची भीषणता मांडली. त्यांनी सांगितले की, आरोपी स्वत:ला देवाचा अवतार म्हणवून महिलांना जाळ्यात ओढत होता. महिलांना तांब्याच्या भांड्यातील पाणी आणि पेढा खाऊ घालायचा, ज्यात गुंगीचे औषध मिसळलेले असायचे. मी देवाचा अवतार आहे. माझ्याशी संबंध ठेवल्याने तू पवित्र झाली आहे, असे सांगून तो महिलांचे लैंगिक शोषण करायचा. गुंगीच्या औषधात नेमके काय मिसळले होते आणि या भोंदूगिरीसाठी तो कोणत्या रत्नांचा वापर करत होता, याचा शोध घेण्यासाठी ५ दिवसांच्या कोठडीची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

-----------

### महामानवाला अभिवादन;चैत्यभूमीवर

निवडणूक चिन्हही माणूस होते. चवदार तळ्याच्या एका चळवळीने देशात सामाजिक क्रांती केली, जगात अनेक ज्ञानी, विचारवंत झाले. मात्र बाबासाहेबांनी त्यांचे ज्ञान स्वत:साठी न वापरता शोषित, वंचित, दीन-दलितांच्या उद्धारासाठी वापरले आहे. संविधान हा आपल्या देशाचा पाया आहे. आज एक सर्वसामान्य व्यक्ती देशाच्या उच्च स्थानी विराजमान होतो. आमच्या सुनेत्राताई उपमुख्यमंत्री होतात.. ही संविधानाची देण आहे. आमच्या सरकारचा डीएनए हा बाबासाहेब असल्याचे म्हटले तर वावगे ठरणार नाही, अशी प्रतिक्रियाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना दिली.मातीचे सोने झाले, भीमा तुझ्यामुळे, जीवनात आनंद झाला भीमा तुझ्यामुळे, चवदार तळ्याचे ओंजळभर पाणी पिले आणि क्रांती झाली, बाबासाहेबांनी दिलेले संविधान हाच आपला आत्मा आहे. आम्ही इथे बसलो ते संविधानाची शपथ घेऊन बसलो. अदिवासी महिला राष्ट्रपती होतात, आणि मी शेतकरी कुटुंबातला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री झालो ते बाबासाहेब यांच्यामुळे. भीमाची लाडकी लेक ज्योती वाघमारे संसदेत पोहोचली, बाबासाहेबांचा विचार हाच आमच्या सरकारचा डीएनए आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

-------------

### मराठी येत नाही मग

ज्ञान असणे, हा नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत. मंत्री प्रताप सरनाईक पुढे बोलताना म्हणाले की, ज्या प्रदेशात आपण राहतो त्या प्रदेशाची भाषा व्यवसायासाठी शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे जितके आवश्यक आहे, तितकेच इतर राज्यात व्यवसाय करताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणेही महत्त्वाचे असल्याचेही सांगितले. शेवटी बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, म्हणूनच १ मे पासून सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा लिहिता येणे व वाचता येणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील. तसेच नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही यावेळी दिला.

----------

### संगिता कुऱ्हाडे खून प्रकरण

दासू कुऱ्हाडे, फुलाबाई चंद्रभान कुऱ्हाडे, शंकर बंडू कुऱ्हाडे, गंगूबाई शंकर कुऱ्हाडे या सर्वांना जन्मठेप आणि दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या खटल्यात सरकारी वकील ए. एस. तांदळे यांनी प्रभावी युक्तिवाद करून आरोपींवरील गुन्हा सिद्ध केला. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन इंगळे, पैरवी अधिकारी श्रीकांत पाखरे, दोषसिद्धी कक्ष प्रभारी प्रदीप ठुबे आणि पोलीस हवालदार चंद्रकला नागरगोजे यांनी खटल्याच्या यशस्वी निकालासाठी परिश्रम घेतले. हा निकाल म्हणजे गंभीर गुन्ह्यांविरुद्ध बीड पोलिसांच्या कटिबद्धतेचे आणि त्यांच्या शास्त्रशुद्ध तपासाचे यश मानले जात आहे.

-------------

### तडजोडीत मान्य केलेली घटस्फोटाची

केंद्राकडे सोपवले. तेथे दोन्ही पक्षांमध्ये लेखी तडजोड झाली. या करारानुसार पतीने पत्नीला १.५ कोटी रुपये, कारसाठी १४ लाख रुपये आणि दागिने देण्याचे मान्य केले. त्या बदल्यात पत्नीने त्यांच्या संयुक्त व्यवसायातील २.५ कोटी रुपये पतीच्या नावे करण्याचे मान्य केले होते. पतीने कराराप्रमाणे ७५ लाख रुपये आणि कारसाठी पैसे दिले, तर पत्नीनेही अडीच कोटी रुपये ट्रान्सफर केले. मात्र, घटस्फोटाच्या अंतिम टप्प्यात पत्नीने आपली संमती अचानक मागे घेतली आणि पती व सासूविरुद्ध कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल केला होता. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राजेश बिंदल आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, ''सामान्यतः घटस्फोटाचा अंतिम निकाल येण्यापूर्वी संमती मागे घेण्याचा अधिकार जोडीदाराला असतो. मात्र, जेव्हा सर्व वादांवर तडजोड होऊन व्यवहार पूर्ण होतात, तेव्हा हा अधिकार उरत नाही. मध्यस्थ किंवा न्यायालयाने प्रमाणित केलेली तडजोड ही मूळ वादाची जागा घेते. त्यातून विनाकारण माघार घेणे म्हणजे न्यायव्यवस्थेवर केलेला हल्ला आहे. अशा प्रकारे शब्दावरून फिरणाऱ्या व्यक्तीवर मोठा दंड आकारला पाहिजे, जेणेकरून मध्यस्थी प्रक्रियेचा कोणीही गैरवापर करणार नाही.

------------

### मुख्यमंत्री फडणवीसांना

पार्टी होते, याची भनक पोलिसांना कशी लागली नाही. मुंबईतील ही घटना दोन मृत्यूमुळे उघड झाली पण अद्याप पोलिस प्रशासन याकडे डोळेझाक करत आहे. सपकाळ पुढे म्हणाले की, मुंबई पोलिस व सरकारी यंत्रणांच्या नाकावर टिच्चून अशा ड्रग्ज व दारूच्या पार्ट्या खुलेआम होत आहेत, हे गृहविभाग व सर्व यंत्रणांचे मोठे अपयश आहे. सुसंस्कृत महाराष्ट्राची तरुण पिढी ड्रग्जच्या विळख्यात अडकण्यास भाजपा महायुती सरकारचा आंधळा कारभार जबाबदार आहे. राज्याच्या एका उपमुख्यमंत्र्यांच्या भावाच्या शेतातच ड्रग्जचा कारखाना सुरू असतो, तो उघड होऊनही थातूरमातूर कारवाई करून प्रकरण दडपले जाते. मुख्यमंत्री फडणवीसही त्याला क्लीन चिट देऊन टाकतात हे अत्यंत गंभीर आहे. राज्यात ड्रग्जचा धंदा खुलेआम सुरू असल्याचे नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर येथील घटनांवरून याधीच उघड झाले पण सरकार काही झोपेतून जागे झाले नाही. ड्रग्ज माफिया ललित पाटील असो, नाशिकमधील ड्रग्ज प्रकरण असो वा साता-यातील ड्रग्जचा कारखाना, या सर्वांचे धागेदोरे सरकारमधील बड्या धेंडांशी असल्याचे महाराष्ट्राने पाहिले आहे. ड्रग्जने आणखी किती मृत्यू होईपर्यंत फडणवीस सरकार गप्प बसून फक्त क्लीनचिट वाटत बसणार? असा सवाल सपकाळांनी उपस्थित केला आहे.

------------

### १०२ संवर्गातील पदांची लोकसेवा

राजपत्रित गट-अ आणि गट-ब परीक्षा पद्धतीचा विस्तार करण्यात येणार असून या दोन्ही परीक्षा योजनेअंतर्गत ६ सेवांमधील एकूण ५७ संवर्गांमध्ये पदभरती केली जाते. सुधारणेनंतर या सेवांमध्ये ४५ संवर्गांचा नव्याने समावेश करून याअंतर्गत एकूण १०२ संवर्गांचा समावेश करण्यात आला आहे.गट-ब (अराजपत्रित) आणि गट-क संवर्गांचे प्रशासकीय तसेच तांत्रिक गटात वर्गीकरण करण्यात येणार आहे. कर्तव्ये आणि जबाबदागयया विचारात घेऊन प्रशासकीय स्वरूपाचे कामकाज असलेल्या २६९ संवर्गांचे १८ गट तर तांत्रिक स्वरूपाचे कामकाज असलेल्या २२१ संवर्गांचे ३० गट करण्यात येतील. यासाठी स्वतंत्र भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि.१५ एप्रिल २०२६



## थोडक्यात



माजलगाव:- येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे सचिव हरिभाऊ सवणे व सर्व अधिकारी कर्मचारी बांधव उपस्थित होते.

### मोठेवाडीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेत, चावडीवर , चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मंगळवार रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.जयंतीनिमित्त सरपंच सत्यभामा दळवी यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी ग्रामसेवक बिभीषण डोरले, उपसरपंच अंगदराव खेत्री,डॉ. रामेश्वर जंगले, समता परिषदेचे तालुका अध्यक्ष जगन्नाथ खेत्री, मुख्यध्यापक तुकाराम शिंदे,पत्रकार राजाभाऊ पास्टे, प्रभाकर खेत्री,प्रा. डॉ .कुंडलिक खेत्री, दत्तात्रय चव्हाण, ज्ञानेश्वर खेत्री, रामकिसन रोकडे, सुदर्शन हिवरकर,अॅड पांडुरंग गोंडे, शिक्षक उत्तमराव ढवळे ,राहुल सरवदे, तुकाराम रासवे, गजानन गोंडे,अशोक दळवी, सोमेश्वर हिवरकर, संजय रोकडे, गणेश सर्जे, मारोती पास्टे, नवनाथ रासवे,वल्लभ वैराळ,गेना गायकवाड यांच्यासह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

### वकृत्व स्पर्धेत रिया ओव्हाळ प्रथम

बीड । प्रतिनिधी

शहरातील बार्शी नाका परिसरात असलेल्या प्रकाश आंबेडकर नगरामध्ये विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या वकृत्व स्पर्धेत रिया उत्तमराव ओव्हाळ हिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले, तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त प्रकाश आंबेडकर नगर येथील जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कुणाल पायाळ व उपाध्यक्ष कामेश धन्वे व कमिटीच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये दि. १२ एप्रिल रोजी विश्वरत्न परमपूज्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर आधारित वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक रिया उत्तम ओव्हाळ हीने पटकवले. तिला स्मृतीचिन्ह देऊन तिचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेवक शितल सूर्यभान चक्रे व प्रीतम चक्रे डॉ जगदीश वाघमारे विशाखा वाघमारे यांनी रिया उत्तम ओव्हाळ हीचा ट्रॉफी देऊन सन्मान केला. यावेळी गोतम ओव्हाळ राहुल जावळे गोरक काळे विलास चक्रे संतोष अहिरे धनंजय आगलावे मयूर वीर बार्शी नाका राहुल नगर प्रकाश आंबेडकर नगर मधील बौद्ध उपासिका व उपासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १३ कोटींच्या बसस्थानकाचा ‘अजब-गजब’ कारभार

## दर्शनी भागात वाहतूक शाखा, झाडाला मीटर, आरओ ठप्प - प्रवाशांची कुचंबणा



तब्बल ३७ हजार रुपये थकबाकी असलेले विद्युत मिटर व फ्युज उघड्यावर प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर



बसस्थानकात पिण्याचे पाणी व्यवस्थापन...शोभेची वस्तू.



बीड बसस्थानकाच्या दर्शनी भागात जिल्हा वाहतूक शाखेची खोली.. नियोजनाचा अभाव..

बीड । प्रतिनिधी

१३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या बीड बसस्थानकात गंभीर अनियमितता समोर येत असून ‘अजब-गजब’ कारभाराची चर्चा रंगली आहे. भव्यदिव्य इमारतीच्या दर्शनी भागातच जिल्हा वाहतूक शाखेची खोली, झाडाला बांधलेले व थकबाकी असलेले विद्युत मीटर, तसेच पिण्याच्या पाण्याची (ठज) ठप्प व्यवस्था आणि सशुल्क शौचालयातील गैरसोयींमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

बसस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरच जिल्हा वाहतूक शाखेची छोटी खोली उभारण्यात आल्याने इमारतीच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यामुळे बसस्थानकाच्या सौंदर्यावर परिणाम होत असून प्रवाशांच्या हालचालींनाही अडथळा निर्माण होत आहे. ही शाखा तत्काळ योग्य ठिकाणी स्थलांतरित करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, बसस्थानक परिसरात झाडाला बांधलेल्या विद्युत मीटरमुळे सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. बांधकाम काळात कंत्राटदाराने घेतलेले हे मीटर आजही उघड्यावर लटकलेल्या अवस्थेत असून त्यावर तब्बल ३७ हजार रुपयांची थकबाकी आहे. उघड्यावर पडलेले फ्युज आणि वायरिंग प्रवाशांसाठी धोकादायक ठरत असून कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता आहे. तरीही संबंधितांवर कारवाई न झाल्याने महावितरणच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

याशिवाय, प्रवाशांसाठी असलेली पिण्याच्या पाण्याची (ठज) सुविधा ठप्प असून ती केवळ शोभेची वस्तू ठरली आहे. सशुल्क शौचालयाची अवस्था देखील अत्यंत दयनीय असून दुर्गंधी, अस्वच्छता आणि कर्मचाऱ्यांकडून होणारे गैरवर्तन यामुळे प्रवाशांची मानसिक कुचंबणा होत आहे.

एकीकडे सर्व सुविधा सुरळीत असल्याचा दावा विभाग नियंत्रक (राज्य परिवहन, बीड) अनुजा दुसाने यांनी केला असला तरी प्रत्यक्ष स्थिती मात्र पूर्णतः विपरीत असल्याचे दिसून येते. संबंधित प्रकरणात अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असून कंत्राटदारांना पाठीशी घालण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोपही होत आहे. या सर्व बाबींवर तातडीने दखल घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे.

## आष्टीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जल्लोषात

आष्टी । प्रतिनिधी

घटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आष्टी शहरात भीमनगर परिसरात विविध कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. सकाळी साडेनऊ वाजता बुद्धविहारात निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करून बौद्ध वंदना करण्यात आली व बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले.

गतवर्षी मिरवणुकीसाठी आणण्यात आलेला, हातात भारतीय राज्यघटना घेतलेला बाबासाहेबांचा पूर्णाकृती देखणा पुतळा यंदाही जयंती सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरला. बुद्धविहारासमोरील प्रेक्षणीय स्थळी हा पुतळा उभारण्यात आला होता. या ठिकाणी उपस्थित सर्व मान्यवर, भीमसैनिक व नागरिकांनी पुष्प



अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमास मराठवाडा भूषण, लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे त्यांच्या अनुयायांकडून मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. तसेच माजी आमदार भीमरावजी धोंडे यांचेही पारंपारिक वाद्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाला माजी आमदार साहेबराव दरेकर, सतीश शिंदे, अजिनाथ सानप, आष्टीचे नगराध्यक्ष जिया भाई बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ अण्णा धोंडे, भारत मुरकुटे, किशोर मामा झरेकर, नगरसेवक सुरेश वारुंगळे, खंडू दादा जाधव (माजी जि.प. सदस्य), बाळासाहेब घोडके, माजी सरपंच नामदेव भाऊ राऊत, अरुण भाऊ कांबळे, गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर परिवंतजी गायकवाड, यशवंत खंडागळे, राम मधुरकर, बाळासाहेब बोराडे, रत्नदीप निकाळजे, वाल्मीक तात्या निकाळजे, प्रबोधन निकाळजे, रितेश बोराडे, जयदीप गायकवाड, राजाभाऊ निकाळजे दीपक भाऊ निकाळजे, राहुल निकाळजे, कुणाल निकाळजे यांच्यासह शहरातील व्यापारी, डॉक्टर, वकील, विविध पक्षांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कुणाल निकाळजे व रुपेश तात्या निकाळजे यांनी केले.

सायंकाळी भीमनगर येथून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. पारंपारिक वाद्यांच्या गजरात, घोषणाबाजी व जल्लोषपूर्ण वातावरणात ही मिरवणूक संपूर्ण शहरातून काढण्यात आली. मिरवणुकीत मोठ्या संख्येने भीमसैनिक, तरुणाई व नागरिक सहभागी झाले होते.एकूणच, आष्टी शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त एकात्मता, उत्साह आणि सामाजिक ऐक्याचे प्रभावी दर्शन घडले.




### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमीत्त रक्तदान शिबीर व अभिवादन सभा

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सामाजिक कार्यकर्ते तथा उपसरपंच अनिलराधे कांबळे यांच्या पुढाकारातुन आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमीत्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीरास रक्तदात्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला तर अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.

उद्घाटक म्हणुन आयुष्यमान भारत मिशनचे महाराष्ट् राज्य प्रमुख ओमप्रकाश शेटे हे तर अध्यक्षस्थांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते मोहनराव जगताप, विशेष उपस्थितीमध्ये खासदार बजरंग सोनवणे तर माजी जि. प.सदस्य डॉ. श्रीराम खळगे,माजी जि. प.सदस्य अरुण इंगळे, नानासाहेब घोडके, युवा नेते राजेभाऊ जाधव, भाजप तालुकाध्यक्ष रूपाली कचरे, नगरसेवक शरद यादव, नगरसेवक अशोक लांडगे, राजेश घोडे, सरपंच अजय शिंदे, सरपंच नारायण भले, चिंचगव्हाणचे सरपंच राज अर्जुन, पुनंदगावचे सरपंच रुद्र कुरे, देवखेडाचे सरपंच शशिकांत मस्के, सरपंच शंकर काळे, सरपंच रामचंद्र सोळंके, सरपंच प्रदीप घाटूळ, सरपंच रामकिशोर चाळक, आबा नाईकनवरे, डॉ दिनकर मस्के, डॉ यशवंत गाडगे, चंद्रसेन पाटोळे, कचरू कांबळे, दशरथ कांबळे, बप्पा कसबे, अंजन कांबळे, धुराजी कांबळे, राम घोडके, प्रदीप कांबळे, प्रवीण कांबळे, विलास कांबळे, संकेत कांबळे, श्याम कांबळे, दत्ता कांबळे, मयूर कांबळे, अविनाश कांबळे, विकास कांबळे, विक्रम कांबळे, संजय कांबळे, चेतन ऑलझेंडे, आदित्य वाघमारे, बबलू आडगळे, आकाश कारके, लखन ऑलझेंडे यांची उपस्थिती होती.

## छोटेवाडी/रामनगर तंडा येथील पाणी फिल्टरचे उदघाटन

माजलगांव । प्रतीनिधी

तालुक्यातील रामनगर तंडा येथील हजार लिटरच्या पाणी फिल्टरचे उदघाटन छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन मोहनराव जगताप यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. या उदघाटन प्रसंगी अॅड.भानुदास डक,संचालक संतोष यादव, सरपंच अंगदराव कटके,अॅड.रामेश्वर शेजुळ,अंगदराव खेत्री, भगवानराव राठोड, भानुदास राठोड,दिगंबर राठोड, वैजेनाथ कटके,राजेभाऊ राठोड, भिमराव राठोड, दिलीप राठोड, विजय राठोड,अनिल राठोड,यांची प्रमुख उपस्थिती होती.

या फिल्टरमुळे येथील ग्रामस्थांना पाच रूपयात वीस लिटर शुद्ध पाणी मिळणार आहे. तंडा हे गाव लहान असले तरी ग्रामपंचायतीच्या माध्मयातून रस्ते, पाणी, वीज या मुलभूत सुविधा पुरविण्यात आघाडीवर आहे.सरपंच



अंगदराव कटके यांनी छोटेवाडी व रामनगर तंडा या गावाचा कायापालट केला आहे.रामनगर तंडा येथे पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या होती. महीलांना गावाबाहेर असलेल्या विहीरीवरून पाणी उपसून आणावे लागत होते. कटके यांनी महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरवून त्यांना शुद्ध पाणी पुरविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार तंड्यावर एक हजार लिटरचा वॉटर फिल्टर प्लँट उभारला आहे. या फिल्टरमुळे ग्रामस्थांना पाच रूपयात वीस लिटर शुद्ध पाणी मिळणार आहे. मिळणाऱ्या पाच रूपयातून फिल्टरच्या देखभालीचा खर्च केला जाणार आहे. सरपंच कटके यांच्या या उपक्रमाचे मोहनराव जगताप यांनी कौतुक केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शरद राठोड व आभार अर्जुन राठोड यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सतीश राठोड,बंडू राठोड,कृष्णा चव्हाण,तुकाराम कटके यांनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

## युसूफवडगांव येथे जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

भारतीय संविधानाचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी भिमनगरमधील विहारामध्ये अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी माजी पं.स सदस्य उमाकांत भुसारी,उपसरपंच महेश लामतुरे,डॉ.महादेव कोरसळे,पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.गुंडाप्पा थळकरी व शिवदास थळकरी यांच्या हस्ते महामानव



भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.यावेळी त्रिसरण,पंचशील बुध्दवंदना घेण्यात आली तसेच भारतीय संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.मन्मथ पाटील,रूपेश बोरगावकर,दादा निकम,गणेश जावळे,सोमनाथ वैरागे,शहाजी शिंदे,बांबु शिंदे,बापुराव चोपणे,सुर्यकांत थळकरी,अरूण राऊत,मल्लिकार्जुन गडकर,भाऊ चोपणे,सुनिल चोपणे,प्रविण वैरागे,शिवकुमार कोरसळे, विकास जाधव,अनिल निकम,रुदुनाना गडकर,पिंटू चोपणे,राजु गायके,ओम लामतुरे,विजय राऊत, महादेव मोडवे,गुंडाप्पा सौंदणे तसेच बौद्ध उपासक,बौद्ध उपासिका भिम अनुयायी,ग्रामस्थ मंडळी व भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### बीडमध्ये १ मे पासून राज्यस्तरीय

कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन तसेच ओंकार साखर कारखाना समूह यांचा विशेष सहभाग राहणार आहे. प्रदर्शनामध्ये आठ भव्य दालनांद्वारे सुमारे २०० हून अधिक कृषी उत्पादनांचे स्टॉल उभारण्यात येणार आहेत. तसेच आधुनिक कृषी अवजारांचे प्रात्यक्षिक, विविध कंपन्यांचे शेतीसाठी उपयुक्त तंत्रज्ञान, सौर ऊर्जेवर चालणारी उत्पादने, शेतीतील नव्या संकल्पनांची माहिती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाहता येणार आहे. या चार दिवसीय महोत्सवात एकदिवसीय पशुप्रदर्शन, डॉग शो, तज्ज्ञांची चर्चासत्रे, धान्य महोत्सव, सौर ऊर्जेवरील उत्पादनांचे विशेष दालन तसेच शेतमजुरीला पर्याय ठरणाऱ्या आधुनिक अवजारांचे स्वतंत्र दालन अशी अनेक आकर्षणे असणार आहेत. उद्घाटन व समारोप सोहळ्यात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान देखील करण्यात येणार आहे. बीड शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीचे संयोजक कृषीभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

धान्य महोत्सवात उत्पादक ते ग्राहक थेट विक्री

शहरी भागातील ग्राहकांना शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले धान्य, कडधान्य व इतर कृषी उत्पादने थेट मिळावीत या उद्देशाने कृषी प्रदर्शनात विशेष धान्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे मध्यस्थांशिवाय शेतकरी आणि ग्राहक यांच्यात थेट व्यवहार होऊन शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्यास मदत होणार आहे. या धान्य महोत्सवात शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिला जाणार असून स्टॉल बुकिंग साठी ९८८१०४५३१५,९४२२२९४३३८ या दूरध्वनी क्रमांका वर संपर्क साधावा.

### शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत

राज्य परिवहन महामंडळ कर्मचारी वृंद आयोजित कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत नवले, श्री. ससाने, श्री. बबनराव वडमारे, श्री. भगवानराव कांडेकर, डी. सी. अनुजा दुसाने, श्री. शिवराज कराड, आगर प्रमुख श्री. पवार साहेब, श्री. नरसिंग मामा, सौ. तांदळे मॅडम, श्री. ससाने साहेब, श्री. अमोल मुळे, सौ. सीमाताई कांबळे, श्री. संदीप वाघमारे, श्री. टाकसाळ साहेब, श्री. बाळासाहेब वाघमारे, श्री. सुंदर वीर, श्री. राहुल बहिर, लेखाधिकारी श्री. मुंडे साहेब, सुरक्षा दक्षता श्री. यादव साहेब, श्री. राम डोळस, श्री. पवन शेटे, श्री. दिगांबर आनेराव सह आदी उपस्थित होते. या कार्यक्रमा सह अल्पोपहार वाटपास शिवसेना जिल्हाप्रमुख अॅड. चंद्रकांत नवले हे उपस्थित होते.

## ना. पंकजाताई मुंडे यांचं नेतृत्व अन् लोकशाहीच्या बळकटीसाठी एसआयआर प्रक्रिया पूर्ण क्षमतेने राबवा - सुनील राणे यांचं आवाहन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे नेतृत्व आणि लोकशाही बळकट करण्यासाठी संघटन मजबूत करणे गरजेचे असल्याचे सांगून मतदार यादी पुनरावलोकन हे अतिशय महत्वाचे आहे. यामुळे बोगस मतदानाला आळा बसणार आहे. या कार्यात सर्व कार्यकर्त्यांनी प्रमाणिकपणे योगदान देऊन राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन भाजपाचे प्रदेश सरचिटणीस सुनिल राणे यांनी आज येथील बैठकीत बोलताना केले.

परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघ सखोल मतदार यादी पुनरावलोकन बैठक आज छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अक्षता मंगल कार्यालयात उत्साहात संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर अल्पसंख्यांक मोर्चाचे नेते सलिम जंहागीर, जेष्ठ नेते संतोष हंगे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सतीश मुंडे, भाजपचे पुर्व मंडळ अध्यक्ष राजेश गिते, पश्चिम मंडळ अध्यक्ष वसंत निर्मळ, अंबाजोगाई मंडळ अध्यक्ष संतोष भगत, शहर मंडळ अध्यक्ष उमाताई समशेट्टी, बीएलए- १ विधानसभा प्रमुख तथा बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे आदींची उपस्थिती होती.

बैठकीच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. वंदेमातरम आणि महाराष्ट्र गीताने बैठकीस सुरुवात झाली. यावळी बोलताना सुनिल राणे यांनी, मतदार यादी पुनरावलोकन कार्याचे महत्त्व सविस्तर विषद केले. हे अभियान कोणाही समाजाच्या, जातीच्या किंवा धर्माच्या विरोधात नाही तर व्यापक राष्ट्रीय हितासाठी राबवल्या जात आहे. दुबार आणि बोगस नावे वगळण्यासाठी हे अभियान आहे असे सांगून २००२ साली अभियान झाले होते आणि नंतर २०४७ साली होणार आहे.त्यामुळे नागरिकांसाठी ही ऐतिहासिक संधी आहे.



पुनरावलोकन (एसआयआर) साठी कुणीही टाळाटाळ करू नये असे आवाहन करून आता नाव वगळले तर पुन्हा यादीत नाव समाविष्ट करून घेणे फार कठीण आहे. यादीचे पुनरावलोकन मोहीम निवडणूक आयोगाकडून राबवली जात असली तरी भाजपच्या कार्यकर्त्यांनी तयार होणार्या यादीवर बारकाईने लक्ष ठेवणे गरजेचे आहे. चुकीची व बोगस नावे सामावून घेतली जाणार नाहीत यासाठी बुथप्रमुखासोबतच बीएलए यांनी काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले. भविष्यातील राजकारणासाठी ना. पंकजाताई व डॉ. प्रितमताई मुंडे यांचे नेतृत्व सक्षम करण्यासाठी भाजपच्या सर्वच कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

लोकनेते मुंडे साहेबांच्या आठवणींना दिला उजाळा

यावेळी बोलताना सुनिल राणे यांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. परळीच्या विकासासाठी साहेबांची प्रचंड तळमळ होती. या भागात इंजिनिअरिंग आणि वैद्यकीय महाविद्यालय व्हावे यासाठी त्यांनी खुप प्रयत्न केले. त्यामुळेच इंजिनिअरिंग महाविद्यालय झाले असे सांगून या भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी जाण्याची गरज पडू नये म्हणून त्यांनी प्रयत्न केले. ना. पंकजाताई व डॉ. प्रितमताई मुंडे या साहेबांचा वसा आणि वारसा चालवत असल्याचे सांगून मुंडे साहेबांनी या भागातील नागरीकांना तळहाताच्या फोडाप्रमाणे सांभाळले. आता दोन्ही ताईंना सांभाळण्याची जबाबदारी प्रत्येकावर आहे. कार्यकर्त्यांनी आता अधिक जोमाने काम करून ही मोहिम यशस्वी करावी असे आवाहन सुनिल राणे यांनी केले.

ना. पंकजाताई मुंडे यांनी साधला दूरध्वनीवरून संवाद

ना. पंकजाताई मुंडे या बैठकीला उपस्थित राहणार होत्या. मात्र नियोजित दौर्यामुळे त्या उपस्थित राहू शकल्या नाहीत. त्यांनी दूरध्वनीवरून कार्यकर्त्यांशी संवाद साधला. मतदार यादी पुनरावलोकन कार्यात कार्यकर्त्यांनी अतिशय कमी वेळात चांगले काम केल्याबद्दल त्यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. ही मोहिम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी काम करण्याचे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी केले. बैठकीला भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनीही मार्गदर्शन केले. भाजपाचे पुर्व मंडळाचे अध्यक्ष राजेश गिते, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीएलए- १ विधानसभा प्रमुख तथा न.प.चे बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले. परळी विधानसभा मतदारसंघात मॅपिंगचे जवळपास ८० टक्के काम पूर्ण झाले आणि उर्वरित काम लवकरच पूर्ण केले जाईल असं त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे संचलन महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा सुचिता पोखरकर व ज्ञानोबा सुरवसे यांनी केले तर सुधाकर पौळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

cmyk

# हळद उत्पादक शेतकरी संकटात, दरात घसरण झाल्याने मोठा फटका

## राजू शेट्टीआक्रमक, आंदोलनाचा इशारा

सध्या हळद उत्पादक शेतकरी संकटात आहेत. कारण हळदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. हळद उत्पादक शेतकऱ्यांसमोरील गंभीर आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा करून हळदीच्या दरात होत असलेली कृत्रिम घसरण, व्यापाऱ्यांकडून होणारी कथित लूट आणि बाजारातील अनियमितता याकडे लक्ष वेधत तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली.

एनसीडीएक्स मान्यताप्राप्त गोडाऊनमध्ये सुमारे बाराशे टन हळद साठवून ठेवण्यात आली आहे. एनसीडीएक्स चे बाजार सदस्य उच्च दरांत एक्सचेंज वर माल विकून खालच्या दर्जाचा आणि दराचा जुना माल डिमेंट वेअरहाऊस मध्ये चुकीच्या पद्धतीने जमा करत असल्याची शंका व्यक्त करण्यात येत आहे. ज्यामुळे दर पडून शेतकऱ्यांचे खूप नुकसान होते. प्रमाणित वेअरहाऊस मध्ये मोठ्या प्रमाणात खालच्या दर्जाचा माल मोठ्या प्रमाणात जमा केल्यामुळे, बाजारात आवक वाढली असे आभासी / कृत्रिम चित्र निर्माण झाले आणि त्यामुळे



सांगलीसह संपूर्ण महाराष्ट्राच्या बाजारातील दरात घसरण झाली आहे. या कृत्रिम परिस्थितीचा परिणाम म्हणून सध्या हळदीचे दर सुमारे १४००० रुपये प्रति क्विंटल इतके खाली आले आहेत, जे शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत तोट्याचे ठरत आहेत. राजू शेट्टी यांनी मांडलेल्या माहितीनुसार, हळद उत्पादनासाठी लागणारा खर्च गेल्या काही वर्षांत प्रचंड वाढला आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी, सिंचन, वाहतूक यांसह सर्वच घटकांचा खर्च वाढलेला असताना, हळदीला मिळणारा दर मात्र वाढण्याऐवजी कमी झाल्याचे दिसून येत आहे. सन २०१० मध्ये हळदीला सुमारे १६००० रुपये प्रति क्विंटल दर मिळत होता. मात्र तब्बल १६ वर्षांनंतरही आज हा दर केवळ १४००० रुपयांवर येऊन ठेपला आहे. म्हणजेच, उत्पादन खर्च वाढूनही शेतकऱ्यांना मिळणाऱ्या दरात घट झाली असून, यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. राजू शेट्टी यांनी म्हटले आहे की, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच हळदीच्या बाजारभावावर कृत्रिम परिणाम करणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, असेही नमूद करण्यात आले.


### १८००० ते २०००० रुपये प्रति क्विंटल दर मिळावा

शेतकऱ्यांच्या हितासाठी संघटनेने एक महत्त्वाचे आवाहनही केले आहे. जोपर्यंत हळदीला किमान १८००० ते २०००० रुपये प्रति क्विंटल दर मिळत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांनी घाईघाईने हळद बाजारात विक्रीस आणू नये. बाजारातील सध्याची परिस्थिती ही शेतकऱ्यांच्या विरोधात असून, अशा वेळी संयम राखणे आवश्यक आहे, असे मत संघटनेने व्यक्त केले आहे. एकत्रितपणे निर्णय घेतल्यासच शेतकरी आपल्या उत्पादनाला योग्य दर मिळवू शकतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# डाळींबाच्या लागवडी योग्य उपयुक्त असणाऱ्या जाती

सध्या डाळींब शेतीला चांगले दिवस आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना चार पैसे मिळू लागले आहेत. यासाठी योग्य जात महत्वाची आहे. लागवडीमध्ये उच्च उत्पादनासाठी आपण ज्या जातींची लागवड करतो ते अतिशय महत्त्वाच्या असतात.

गणेश : या प्रकारच्या डाळिंबाचे फळ आकाराने खूप मोठी असते. मोठी, साल लाल आणि पिवळ्या रंगाचे मिश्रण असते. बिया मऊ गुलाबी असतात. ही महाराष्ट्रातील व्यावसायिक शेती आहे. एका झाडापासून सरासरी उत्पादन ८ ते १० किलो असते. ही जात १९३६ मध्ये विकसित करण्यात आली. १९७० मध्ये त्याचे नाव ॲलन डी वरून बदलून गणेश असे करण्यात आले. या जातीच्या एका फळाचे वजन २०० ते ३०० ग्रॅम असते. गोड, रसाळ आणि जेवणात रुचकर, त्याच्या दाण्यांचा रंग हलका गुलाबी असतो. एका झाडाला ८ ते १२ किलो फळ मिळते .



कमान :हे फळ गणेश जाती पेक्षा लहान असून मऊ बिया असलेले गडद लाल आहे.

मऊ : बिया गडद लाल आहेत त्यात मुख्यत: गणेश प्रकाराचा समावेश आहे.

बहर : सरासरी प्रत्येक फळांचे वजन सुमारे २५० ते ३०० ग्रॅम असते.

मस्कत : या प्रजातीच्या फळांमध्ये गुलाबी बिया असतात. ज्यांचा वरचा भाग लाल असतो. फळांचे वजन सरासरी ३०० ते ३५० ग्रॅम असते.

ज्योतिष : हा प्रकार आयआयएचआर, बेंगलोरने विकसित केला आहे. फळे मोठी, चमकदार रंगाची असतात. आणि बिया जास्त रसाने मऊ असतात.

या प्रकारची फळे दुष्काळ सहन करतात कारण ती झाडांच्या फांद्यामध्ये असतात.

रुबी : हे प्रजाती देखील आयआयएचआरने बंगळुरूमध्ये विकसित केले आहे. साल लालसर तपकिरी असते.आणि हिरव्या रेषा लाल असतात.

फळांचे वजन २७० ग्रॅम आहे आणि सरासरी उत्पादन १६ ते १८ टन प्रति हेक्टर आहे.

ढोलका : फळे आकाराने खूप मोठी आहेत आणि विशेषत: गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढतात.

# तणनाशक फवारणी करताना ही माहिती जाणून घ्या

तणनियंत्रण किंवा तणनाशक फवारणी हे महत्त्वाचे कार्य आहे. मात्र अनेकजण चुकीच्या पद्धतीने तणनाशकाची फवारणी करत असल्याने त्याचा फायदा होण्यापेक्षा नुकसानच होताना दिसत आहे. त्यामुळे तणनाशक फवारणीसाठी लक्षात ठेवण्याच्या महत्त्वाच्या बाबी समजून घेतल्या पाहिजेत.

वेगवेगळ्या पिकातील तण आणि उपयुक्त तणनाशके : सूचीपर्णी पिकांसाठी: गहू, भात, ऊस, ज्वारी, आदी पिकांमध्ये २-४ डी हे हार्मोनवर्धक तणनाशक फवारले जाते. चपट्या पानांच्या पिकांसाठी: कापूस पिकांतील तणनाशक फवारण्यासाठी पेंडीमेथैलिन याची फवारणी केली जाते. सर्व प्रकारच्या तणांच्या समूळ उच्चाटनासाठी: सर्व प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी जेव्हा पीक उभे नसेल तेव्हाच राउंडअप फवारणी केली जाते.

तणनाशक फवारणीसाठी महत्त्वाच्या बाबी : जमिनीत ओलावा असताना तणनाशकाची फवारणी केल्यास ते अधिक फायदेशीर ठरत असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे जमिनीत चांगला ओलावा निर्माण झाला व थोडीशी उघडीप मिळताच शेतकर्यांनी तणनाशक फवारणी करावी. काही शेतकरी कोरड्यावरच फवारणी करीत आहेत; अशा कोरड्या जमिनीत तणनाशक फवारणी टाळावी. तण कोवळे असताना तणनाशक फवारल्यास ते त्यावर मारक ठरते. कोवळे तण लवकर मरते. शक्यतो जमिनीत ओलावा असतानाच तणनाशकांची फवारणी करावी, तणनाशक फवारणीनंतर जमिनीला पाणी देऊ नये अन्यथा



तणनाशकाचा पाहिजे तेवढा परिणाम होणार नाही. तणनाशक फवारणी केलेली टाकी तसेच फवारणी पंप लगेच दुसर्या पिकांवर फवारणीसाठी उपयोगात आणू नये. तो पंप स्वच्छ, गरम पाण्याने साफ करूनच त्याचा वापर करावा. बाजारात अनेक प्रकारची तणनाशके उपलब्ध आहेत. पिकांमध्ये कोणत्या प्रकारचे तण अधिक आहे, त्यानुसार तणनाशक खरेदी करावे. चुकीचे तणनाशक फवारणी केल्यास पिकांना याचा फटका बसतो. जमिनीची गुणवत्ता आणि प्रकार बघूनच तणनाशक फवारणी करावे. अनेकदा हलक्या जमिनीत घातक तणनाशक फवारणी केल्यास याचा पिकांच्या उत्पादनासह जमिनीच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. तणनाशक फवारणी करताना जमिनीत ओलावा असावा, वातावरण चांगले असावे, स्वच्छ पाणी, स्वच्छ पंप, कीटकनाशकापासून तणनाशक दूर ठेवणे, आदी काळजी घ्यावी लागते.

# मुक्तसंचार गोठापद्धत आणि त्याचे फायदे

आपल्याकडे शक्यतो बंदिस्त गोठा पद्धतीनुसारच पशुपालन करण्याची प्रथा रुजू आहे. पण बंदिस्त गोठ्यासाठी काही मर्यादा येतातच. यासाठी मुक्तसंचार गोठा पद्धत महत्वाची ठरत आहे. बंदिस्त गोठ्याच्या मर्यादा : दुग्ध व्यवसाय यशस्वी करण्यासाठी काही महत्वाच्या गोष्टींबाबत जसे जनावरांचे आजार, त्यांचा माज याविषयी सतर्क राहणे आवश्यक असते.

बंदिस्त गोठ्यात दुधाळ जनावरांना थायलेरियासीस, कासदाह, किटोसिस हे मुख्य ३ आजार होतात. बंदिस्त गोठ्यात गोचिडांना लपण्यास भरपूर जागा असते. त्यांच्यामुळे जनावरांना विविध रोग होतात. बंदिस्त गोठ्यात जनावर जेथे उभे राहते तेथे शेण, मल-मूत्र पडत असल्याने ती जागा कायम ओली राहते. त्यावर काडीकचरा पडलेला असतो. त्यावरच जनावरे बसतात. त्यामुळे कासदाह रोग होतो. गायी-म्हशी मुका माज दाखवितात.

बंदिस्त गोठ्यात ही गोष्ट लक्षात येत नाही; मात्र मुक्त संचार गोठा पद्धतीत अशा गाईला ओळखणे सोपे होते. माजाची लक्षणे लगेच ओळखता येतात आणि माज ओळखता येणे हेच तर दुग्ध व्यवसाय यशस्वी होण्यामागील कारणांपैकी एक गमक आहे. यातून मुक्तता मिळावी म्हणून मुक्त संचार गोठा पद्धत वापरली जाते.

मुक्तसंचार गोठा पद्धत म्हणजे काय :

मुक्तसंचार गोठ्या मध्ये गाईंना बांधले जात नाही. गाईंना एका मोठ्या कंपाऊंड मध्ये शेड बांधून मोकळे सोडले जाते. त्यांच्या चाऱ्याची व



पाणी पिण्याची व्यवस्था तिथेच गव्हाणा मध्ये करण्यात येते. शेण वारंवार काढले जात नाही. गाई एकमेकांना मारत नाहीत.

जागेची मर्यादा आणि पद्धत :एका गाईला किंवा म्हशीला मुक्त संचार पद्धतीच्या गोठ्यात मोकळे सोडण्यासाठी कमीत कमी २०० चौ. फूट जागा लागते. एक गुंठा जमीन क्षेत्रात आपण पाच मोठी जनावरे मोकळी सोडू शकतो. गाईला मुक्त सोडण्या पूर्वी तार जाळीचे किंवा भिंतीचे अर्ध्या जाळीयुक्त कंपाउंड करून आत मध्ये गव्हाण व पाण्याच्या हौदाची व्यवस्था करणे आवश्यक असते. गाईला मोकळे सोडल्यावर एक ते दोन दिवस मुक्त पद्धतीची सवय लागण्यात जातात. या कालावधीत शेतकऱ्याने सतर्कता बाळगायला हवी. गाई मोकळ्या सोडल्यावर त्या एकमेकींना मारतील या भीतीने शेतकरी मुक्त गोठा पद्धत अवलंब करण्यापासून माघार घेतात. परंतु पहिले दोन दिवस सवय लागल्यावर गाई एकमेकांना मारत नाहीत. जर एखादी गाय इतर गाईंना मारत असेल तर तिला पायकूट घालून आपण प्रतिबंध करू शकतो. गाईच्या तोंडाच्या म्होरकीला एक बाज व कोणत्याही एका पायाच्या गुडघ्याच्या थोडेसे वर असे दोरीच्या साहाय्याने आखडून बांधणे म्हणजेच पायकूट घालणे होय. अशा प्रकारे आपण जनावरांच्या हालचालीवर प्रतिबंध घालू शकतो. मुक्त संचार पद्धतीत एका गाईला १५० ते २०० चौ. फूट याप्रमाणे जागा उपलब्ध करून देणे, याशिवाय सावली आणि ऊन, पिण्याचे पाणी, चारा आणि तेथेच दूध काढण्याची सोय उपलब्ध केल्यामुळे त्यांना पाहिजे त्या वेळी त्यांच्या आवडीनुसार आणि वेळेनुसार चारा खातात, पाणी पितात, हवामानातील बदलानुसार ऊन- सावली घेतात स्वच्छ जागेत जाऊन बसतात, त्यामुळे त्यांच्या शरीराला शेण लागत नाही, स्वच्छंदाने त्या फिरतात. त्यांच्या इच्छेनुसार निवांत बसून चांगले रवंथ करतात. त्यामुळे दुधाचे उत्पादन वाढते. त्यांना फिरता येत असल्यामुळे नखे वाढत नाहीत, गोचीड होत नाहीत, आजाराचे प्रमाण कमी होते. मोकळ्या सोडलेल्या गाईंच्या अंगावर एक वेगळी चकाकी येते. त्यांनी दिलेल्या दुधातील जैविक घटकांमध्ये निश्चित बदल होऊ शकतात.

मुक्त संचार गोठा पद्धतीचे फायदे : १. स्वच्छतेसाठी कमी वेळ लागतो व मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होते.२. कमी मनुष्यबळ लागते. ३. गोठे बांधण्यावरील खर्च कमी होतो. ४. खाद्य,चारा व पाणी यांचा योग्य उपयोग होतो. ५. जनावरांना व्यायाम मिळाल्याने ते निरोगी राहतात. ६. स्तनदाहाचे प्रमाण कमी होते. ७. जनावरे मुक्तपणे माज दाखवतात. ८. ताण कमी होतो आणि उत्पादनात ५ ते १० टक्के वाढ होते. ९. प्रजननासंबंधी समस्या कमी होतात. १०. खुरांची योग्य निगा राखल्याने जनावरे लंगडत नाहीत. ११. जनावरांची झपाट्याने वाढ होते व उत्पादन वाढते.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७३ : मराठा साम्राज्याचे सरनौबत प्रतापराव गुजर यांनी बहलोलखान पठाणाविरुद्ध मोठी लढाई जिंकली.
१८९२ : जनरल इलेक्ट्रिक कंपनीची स्थापना झाली.
१८९५ : साली स्वातंत्र्यपूर्व भारतातील थोर समाजसुधारक व क्रांतिकारक लोकमान्य टिळक यांनी सर्वप्रथम कोकणातील रायगड किल्ल्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज याची जयंती साजरी केली.
१९१२ : आर. एम. एस. टायटॅनिक हे जहाज उत्तर अटलांटिक महासागरात बुडाले.
१९२३ : मधुमेह असणा-यांना इन्सूलिन वापरण्यासाठी सामान्यतः उपलब्ध झाले.
१९४० : दुसरे महयुद्ध नाझी जर्मनीच्या ताब्यात असलेल्या नॉर्वेतील नॉर्विक शहरावर दोस्त राष्ट्रांच्या फौजांनी हल्ला सुरू केला.
१९९४ : भारताने गॅट करारास मान्यता दिली.
१९९७ : मक्केपासून सहा किमी अंतरावरील मिना (सौदी अरेबिया) येथे हज यात्रेकरुंच्या तंबूला आग लागून किमान ३०० जण मृत्युमुखी पडले.
१९९८ : थम्पी गुरु म्हणून प्रसिद्ध असलेले फ्रेडरिक लेंज यांचे निधन.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४५२ : लियोनार्दो दा व्हिंची, इटालियन गणितज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, चित्रकार.
१४६९ : गुरू नानक देव शिख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू (मृत्यू: २२ सप्टेंबर १५३९)
१५६३ : शिखांचे पाचवे गुरु गुरु अर्जुन देव यांचा जन्मदिन.
१७०७ : स्विस गणितज्ञ लिओनार्ड ऑयलर यांचा जन्म. (मृत्यू: १८ सप्टेंबर १७८३)
१७४१ : चार्ल्स विल्सन पील अमेरिकन चित्रकार, निसर्गवैज्ञानिक व सैनिक (मृत्यू: २२ फेब्रुवारी १८२७)
१८९३ : नरहर रघुनाथ तथा न. र. फाटक चरित्रकार, टीकाकार, इतिहास संशोधक, संत साहित्याचे अभ्यासक व लेखक (मृत्यू: २१ डिसेंबर १९७९)
१८९४ : निकिता क्रूश्चेव्ह सोविएत युनियनचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ११ सप्टेंबर १९७१)
१९०१ : अजय मुखर्जी भारतीय राजकारणी यांचा जन्म.
१९१२ : मल्हार सदाशिव तथा 'बाबूराव' पारखे उद्योजक व वेदाभ्यासक (मृत्यू: १३ जानेवारी १९९७)
१९१२ : किम सुंग (दुसरे) उत्तर कोरियाचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ८ जुलै १९९४)
१९२२ : गीतकार हसरत जयपुरी यांचा जन्म. (मृत्यू: १७ सप्टेंबर १९९९)
१९३२ : कवी सुरेश भट यांचा जन्म. (मृत्यू: १४ मार्च २००३)
१९४० : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय शिखर घराण्यातील शास्त्रीय गायक व सारंगी वादक उस्ताद सुलतान खान यांचा जन्मदिन.
१९६३ : भारतीय क्रिकेटपटू मनोज प्रभाकर यांचा जन्म.
१९७२ : प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्या, क्रिकेट ग्लॅमर, फॅशन मूर्ती मंदिरा बेदी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९४ : मोरेश्वर रामचंद्र पराडकर उर्फ 'मोरोपंत' पंडीतकवी चैत्र शु. १५ (जन्म: ? ? १७२९)
१८६५ : अब्राहम लिंकन, अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा राष्ट्राध्यक्ष.
१९१२ : जगप्रसिध्द टायटॅनिक बोटीला धक्का लागून जलसमाधी मिळाल्याने अनेक लोकांचा मृत्यू.
१९१२ : एडवर्ड जे. स्मिथ आर. एम. एस. टायटॅनिक जहाजाचा कप्तान (जन्म: २७ जानेवारी १८५०)
१९८० : जेआँ-पॉल सार्त्र फ्रेन्च लेखक, कवी, तत्त्वज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २१ जून १९०५)
१९९० : ग्रेटा लोविसा गुस्ताव्हसन ऊर्फ 'ग्रेटा गार्बो' हॉलिवूड अभिनेत्री (जन्म: १८ सप्टेंबर १९०५)
१९९५ : पंडित लीलाधर जोशी तत्कालीन मध्यभारत राज्याचे पहिले मुख्यमंत्री (जन्म:)
१९९८ : पॉल पॉट कंबोडियातील २० लाख नागरिकांच्या हत्याकांडास जबाबदार असणारा 'ख्मेर रुज'चा नेता (जन्म: १९ मे १९२५)
२०१३ : वि. रा. करंदीकर संत साहित्याचे अभ्यासक (जन्म: २७ ऑगस्ट १९१९)

# गुळात सिंथेटिक रंग आढळल्याने गूळ सौदे बंद

## प्रयोगशाळेत तपासणी करूनच आता खरेदी होणार

कोल्हापूर / प्रतिनिधी

कोल्हापूरबाजार समितीतून गुजरातला पाठवल्या जाणाऱ्या गुळाची प्रयोगशाळेत तपासणी करून त्यामध्ये भेसळ नसल्याच्या दाखल्यासह पाठवा तरच खरेदी करू. असा पवित्रा अहमदाबाद (गुजरात) येथील खरेदीदार असोसिएशनने घेतल्याने कोल्हापुरातील व्यापाऱ्यांची कोंडी झाली आहे.

सिंथेटिक रंगाचा वापर केला तर गूळ खरेदी केला जाणार नसून, सोमवारपासून बाजार समितीमधील खरेदी बंद करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात गुजरातमधील एका व्यापाऱ्यावर गुळात सिंथेटिक रंग आढळल्याने तेथील प्रशासनाने गुन्हा दाखल केला होता. त्यामुळे भीतीपोटी बहुतांशी इतर व्यापाऱ्यांनी गूळ खरेदी करण्यास नकार दिल्याने पेच निर्माण झाला आहे. गुजरातमधील चार असोसिएशने रंगमिश्रित व प्रयोगशाळेचा तसा रिपोर्ट नसलेला गूळ खरेदी करणार नाही, असे शाहूपूरी मर्चेंट असोसिएशनला कळविले आहे.

दरम्यान, बिगर रंगाचा गूळ काही शेतकऱ्यांनी तयार करून आणला होता. पण, असा गूळही कोणी खरेदी करेना, नियमित गुळापेक्षा किलोमागे पाच ते सहा रुपये कमी दराने गुळाची मागणी होऊ लागल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. गुजरातमध्ये सिंथेटिक रंग सापडलेला गूळ हा कर्नाटकातून खरेदी केलेला होता. मात्र, सरसकट कोल्हापुरातून येणारा गूळ घेण्यास तेथील व्यापाऱ्यांनी नकार दिला आहे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ ५

# डॉ. आंबेडकरांचे विचार समाजपरिवर्तनासाठी आजही मार्गदर्शक-भास्कर दानवे

## भाजपा कार्यालयात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

जालना। प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महान समाज सुधारक, क्रांतिकारी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भाजपा जिल्हा कार्यालय, जालना व मस्तगड येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून वंदन केले.



यावेळी बोलताना भास्कर आबा दानवे म्हणाले की, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाला समानता, न्याय व बंधुता यांचे अमूल्य विचार दिले. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आपण सर्वांनी समाजहितासाठी कार्यरत राहणे आवश्यक आहे. शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना सशक्त करण्याचे महान कार्य केले. त्यांनी दिलेल्या भारतीय संविधानामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार आणि न्यायाची हमी मिळाली आहे. युवकांनी त्यांच्या विचारांचे अनुसरण करून शिक्षणाला प्राधान्य देत समाजपरिवर्तनासाठी काम केले पाहिजे. संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबत देशाच्या विकासात सक्रिय सहभाग घेणे ही आपली जबाबदारी आहे. डॉ. आंबेडकरांचे विचार हे केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहेत. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण सर्वांनी एक सशक्त आणि प्रगत भारत घडविण्यासाठी कटिबद्ध राहिले पाहिजे असे हि त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, संध्याताई देठे, नगरसेविका सखुबाई पणबिसरे, पुष्पा मेहेत्रे, रामेश्वर भांदरगे, सोपान पेंढारकर, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, सिद्धिविनायक मुळे, सुनील पवार, अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळकर, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष सोमेश काबलिये नगरसेवक अर्जुन गेही, कल्याण भदनेकर, जिल्हा चिटणीस सुभाष सले, रोहित भुरेवाल, देविदास देशमुख, राजेश जोशी, संतोष खंडेलवाल, संजय भगत, राजाराम जाधव, दत्ता जाधव, उमेश पेंढारकर, नामदेव नागवे, सुदर्शन काळे, माणिक फड, अनिरुद्ध पांजगे, राहुल गायकवाड, गुलाब पणबिसरे, नानासाहेब देव्हडे, शाम उगले, निलेश गवळी, गौरव गोधेकर, गणेश पांजगे आदींची उपस्थिती होती.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या सूचनेनुसार जालना महानगर जिल्ह्यात विविध ठिकाणी दीपोत्सव साजरा करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी विविध ठिकाणी भेटी देऊन कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

# तहसीलदार यांनी वाळू माफियाचे वाळून भरलेली दोन टिप्पर पकडले

**मंठा । प्रतिनिधी**

**पूर्णा नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उपशाच्या विरोधात मंठा तहसीलदार सुमन मोरे यांनी मंगळवारी दुपारी मोठी कारवाई केली. भर उन्हात दोन किलोमीटर पायी चालून तहसीलदारांनी किर्ला शिवारात छापा टाकला. या कारवाईत वाळूने भरलेले दोन टिपर जप्त करण्यात आले असून, मनुष्यबळ कमी पडल्याचा फायदा घेत एक टिपर घटनास्थळावरून पसार झाला.**



मिळालेल्या माहितीनुसार, किर्ला गावच्या हद्दीतील पूर्णा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूची वाहतूक सुरू असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. परतूरचे उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सुमन मोरे यांनी मंगळवारी दुपारी १२ च्या सुमारास कारवाईचे नियोजन केले. वाळू माफियांचे खबरे मुख्य रस्त्यावर तैनात असल्याने त्यांना चकवा देण्यासाठी तहसीलदारांनी खाजगी वाहनाचा वापर केला आणि मुख्य रस्ता सोडून शेतरस्त्याने पायी जाण्याचा निर्णय घेतला. भर उन्हात सुमारे दोन किलोमीटरची पायपीट केल्यानंतर तहसीलदारांचे पथक नदीपात्रानजीकच्या शेतात दबा धरून बसले. दुपारी साडेतीनच्या सुमारास वाळूने भरलेले तीन टिपर येताना दिसताच पथकाने झडप घालून ते अडवले. मात्र, पथकात तहसीलदारांसह केवळ दोन चालक असल्याने एका टिपर चालकाने वाहन वेगाने पळवून नेले. दोन टिपर ताब्यात घेण्यात पथकाला यश आले असून ते मंठा तहसील कार्यालयात जमा करण्यात आले आहेत. घटनास्थळावरून पसार झालेल्या टिप्परचे व्हिडिओ चित्रीकरण प्रशासनाकडे उपलब्ध असून या टिप्पर विरोधात कारवाई करणार असल्याचे तहसीलदार सुमन मोरे यांनी सांगितले.

## थोडक्यात



### जि.प प्राथमिक शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

रोहिलागड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील चिकनगांव येथे दि.१४/४/२०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार कायदेपंडित माहामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करित असताना गावाचे सरपंच रामदास पाटील खांडेभराड शाळा समिती अध्यक्ष उध्दव बापु खांडेभराड उपाध्यक्ष अशोक महेर व सर्व शाळा समिती सदस्य व शाळेचे मुख्याध्यापक पवार सर व सर्व शिक्षक वर्ग व क्रांती गुरू लहुजी साळवे विकास परिषद ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष आर्सुड व ग्रामपंचायत कर्मचारी व गावातील जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गवळी सर यांनी केले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा!या बाबासाहेबांच्या मंत्राचा जागर करत, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेऊया. जगातील शोषित, पीडितांना हक्क मिळवून देणाऱ्या, अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या महामानवाला अभिवंदना करण्यात आली.

### कर्जत येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

कर्जत। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील कर्जत येथे दिनांक १४ एप्रिल रोजी विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर. १३५ वी जयंती कर्जत



गावामध्ये आनंदाने साजरा करण्यात आली. त्याप्रसंगी प्रगतशील शेतकरी श्री पांडू तात्या डोंगरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यानंतर श्री राहुल भीमराव डोंगरे भावी जिल्हा परिषद सदस्य पारनेर सरकर. यांनी आपली उपस्थिती दर्शवली. रमेश येडे किशोर काळुंके. पोलीस पाटील जगदीश रावसाहेब पवार यांनी आपले विचार मांडले. याप्रसंगी. रावसाहेब गवळी मुकेश काळुंके. सर्जेराव गवळी रवी गवळी . बाबासाहेब गवळी, आजी-माजी पदाधिकारी व सर्व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालक व आभार प्रदर्शन श्री सुनील रामजी काळुंके.. यांनी केले.

### सरोजाताई बोराडे यांचे निधन

मंठा। प्रतिनिधी



कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे यांच्या आई, तसेच नगरसेविका सौ. सरोजाताई प्रल्हादराव बोराडे यांच्या सासूबाई श्रीमती प्रयागबाई रेणाजीराव बोराडे यांचे सोमवार ता.१३ रोजी सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ११३ वर्षे होते. शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे, पंजाबसिंह बोराडे व मानसिंह बोराडे यांच्या त्या आजी होत्या. त्यांच्यावर मंगळवार रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंड, पतवंड असा मोठा परिवार आहे.

# दवाखान्यात पोलिसाची अरेरावी;जखमी फिर्यादीची जबाबासाठी हेळसांड पाहून जनतेत संतापाची लाट !


पाथर्डी। प्रतिनिधी

चुकीच्या कार्यपद्धतीमुळे ऊसतोड कामगारांकडून मारहाण झाल्याच्या घटनेनंतर दुसऱ्या एका वेगळ्या घटनेतील जखमी पेशंटचा जबाब नोंदवण्यासाठी सिव्हिल हॉस्पिटल मध्ये गेलेल्या त्याच पोलीस कर्मचाऱ्यांची अरेरावी समोर आली असून या प्रकारामुळे पाथर्डी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे अहिल्यानगर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या पाथर्डी येथील जखमी फिर्यादीचा जबाब नोंदवण्यासाठी आलेल्या पोलिसांकडून सुरुवातीला आरोपीचे नावे ऐकून टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप आहे यावेळी पोलिस कर्मचारी पो.हे.को.बक्कल नंबर १३०९ अल्ताफ अहमद शेख यांनी जखमीला फोन आल्याचा राग मनात धरून जखमी व त्यांच्या नातेवाईकांशी अभद्र वर्तन केल्याचेही सांगितले जाते प्रत्यक्षात जखमी फिर्यादी आरोपींची नावे स्पष्टपणे सांगत असतानाही संबंधित पोलिस कर्मचाऱ्याने जबाब नोंदवून घेण्यास नकार दिल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत त्यामुळे संतप्त झालेल्या जखमी व त्यांच्या नातेवाईकांनी संपूर्ण प्रकार मोबाईलमध्ये चित्रित करत पोलिसांना कायदेशीर काही चौकटीत प्रश्न विचारले या घटनेनंतर अखेर पोलिसांनी जबाब नोंदवून घेतला मात्र तोपर्यंत दवाखान्यातील इतर रुग्ण आणि नातेवाईकांसमोर हा सर्व प्रकार घडल्याने पोलिस प्रशासनाची प्रतिमा मलिन झाली आहे धक्कादायक बाब म्हणजे जखमी पेशंटला स्वतः बेडवरून उठून जबाब नोंदवून घेण्यासाठी पोलिसांच्या मागे रुग्णालयाच्या प्रवेशद्वारापर्यंत जावे लागले लोकशाही व्यवस्थेत कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या पोलिसांकडून अशा प्रकारची वागणूक मिळणे अत्यंत लाजिरवाणे असून या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

# पाथर्डी शहरात डॉ.बाबासाहेबांची जयंती उत्साहात साजरी

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी शहरात विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली विशेष म्हणजे राजकीय पक्षाचे झेंडे बाजूला ठेवत भाजपा राष्ट्रवादी अजित पवार व राष्ट्रवादी शरद पवार या गटाच्या सर्व नेत्यांनी पाथर्डी शहरातील आंबेडकर चौकात बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत जयंती साजरी करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या शिका संघटित व्हा व संघर्ष करा आणि समता बंधुभाव व गौतम बुद्धांच्या शांततेच्या मार्गाने कायद्याचे स्वराज्य निर्माण व्हावे यासाठी लोकशाही दृढ करण्याचा निश्चय व्यक्त केला यावेळी आमदार मोनिका राजळे



ज्येष्ठ नेते एड.प्रताप ढाकणे नगराध्यक्ष अभय आव्हाड उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे नगरसेवक नंदकुमार शेळके अमोल गर्जे देवा पवार भाजपा तालुका अध्यक्ष धनंजय बडे भाजपा युवक जिल्हाध्यक्ष सचिन वायकर आरपीआय तालुका अध्यक्ष बाबा राजगुरू जगदीश गाडे राष्ट्रवादी अजित पवार गट कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पालवे प्रवीण वाघमारे शुभम गर्जे चांद मणियार कादिर शेख बाळासाहेब दराडे असे अनेक आंबेडकर समर्थक उपस्थित होते.

# तुळजाभवानी मंदिराचा विकास ५० वर्षांचा विचार करून-आ.पाटील

धाराशिव। प्रतिनिधी

तुळजाभवानी देवीच्या मंदिर परिसराचा विकास करताना प्राचीन दगडी वास्तुकलेला जपून नव्या कामांमध्ये दगडी बांधकाम व नक्षीकामाला विशेष महत्त्व दिले जात आहे. आगामी ५० वर्षांचा विचार करून ही विकासकामे हाती घेण्यात आली असून दर आठवड्याला या कामांचा आढावा घेतला जाणार असल्याची माहिती मंदिर समितीचे विश्वस्त आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना आमदार पाटील यांनी सांगितले की, मे महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा तुळजापूर दौरा अपेक्षित आहे. मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामांची सुरुवात लक्षात घेता, मुख्य महाद्व ारातून भाविकांना प्रवेश देण्याबाबत तसेच दर्शन मंडपाच्या जागेची निश्चिती स्थानिकांच्या भावना आणि पुजारी मंडळाच्या सूचनांचा विचार करून करण्यात आली आहे. या विकास आराखड्याला राज्य शासनाची मान्यता मिळाली असून राज्य पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार आवश्यक बदल केले जात आहेत. शिखर बांधकामासंदर्भात आयआयटीकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्य शासन भाविकांना अधिक चांगल्या सुविधा आणि जलद दर्शन मिळावे यासाठी तिरुपती बालाजी येथील दर्शन व्यवस्थेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कामकाज करत आहे. कुलधर्म व कुलाचार पार पाडण्यासाठी मातंगी मंदिराच्या बाजूस स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. मंदिर परिसरातील पुजारी बांधवांची घरे व दुकाने यासंदर्भात समाधानकारक मोबदला देण्याचा प्रयत्न सुरू असून सुमारे ७० जागा मालकांनी यासाठी सहमती दर्शविली आहे. तसेच विविध विकासकामांबाबत जनतेच्या भावना समजून घेण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याच्या उद्देशाने सुमारे ५० विकास मित्र नियुक्त करण्याची घोषणा लवकरच करण्यात येणार असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले. याशिवाय तुळजापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी संपूर्ण महिनाभर जनता दरबार आयोजित करण्यात येणार असून, सभापती विक्रम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित राहतील. या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रश्न जागेवर सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या पत्रकार परिषदेस नगराध्यक्ष विनोद गंगणे, उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, भाजप तालुकाध्यक्ष आनंद कंदले, गटनेते औदुंबर कदम, नगर-सेवक सागर कदम, युवक नेते संदीप गंगणे, विशाल छत्रे आणि रत्नदीप भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

# राजुर ते पैठण एसटी बस सेवा सुरू

जालना। प्रतिनिधी

श्री क्षेत्र राजुर गणपती ते तीर्थक्षेत्र पैठण ही चनेगाव, चिखली, सागरवाडी, नागठाणा, वंजारवाडी, डपका तांडा, कंडारी खुर्द, कंडारी बुद्रुक, लक्ष्मण नगर तांडा, परदेशी वाडी, अकोला निकळक, रामखेडा, बदनापूर बस स्थानक, धोपटेश्वर, नानेगाव बदापूर, माहेर भायगाव, किनगाव चौफुली ते पाचोड मार्गे पैठण याप्रमाणे धावणारा असून या एस.टी बस सेवा सुरू करावी म्हणून राजूर व बदनापूर परिसरातील नागरिकांनी आ. नारायणराव कुचे यांच्याकडे मागणी केली होती त्यांची एस. टी महामंडळाने दखल घेऊन आज सोमवार दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी श्री क्षेत्र राजूर ते पैठण एस.टी बस सेवेचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

मोठ्या संख्येने ग्रामस्थ या एस.टी बस सेवा शुभारंभ प्रसंगी उपस्थित होते.यावेळी श्री क्षेत्र राजुर ते पैठण बस सेवा सुरू झाल्याने आ. नारायणराव कुचे यांचे प्रवासी व भाविकांनी आभार मानले सदर बस सेवा ही आता कायमस्वरूपी सुरू राहील व राजुर पैठण या दोन्हीही तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या गावातील नागरिकांना याचा लाभ होणार असल्याचे मत आ. नारायणराव कुचे यांनी व्यक्त केले आहे व प्रवासी व भाविकांनी आ. नारायणराव कुचे यांचे आभार मानले.

# दवाखान्यात पोलिसाची अरेरावी जखमी फिर्यादीची जबाबासाठी हेळसांड पाहून जनतेत संतापाची लाट !

**पाथर्डी । प्रतिनिधी**

चुकीच्या कार्यपद्धतीमुळे ऊसतोड कामगारांकडून मारहाण झाल्याच्या घटनेनंतर दुसऱ्या एका वेगळ्या घटनेतील जखमी पेशंटचा जबाब नोंदवण्यासाठी सिव्हिल हॉस्पिटल मध्ये गेलेल्या त्याच पोलीस कर्मचाऱ्यांची अरेरावी समोर आली असून या प्रकारामुळे पाथर्डी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे अहिल्यानगर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या पाथर्डी येथील जखमी फिर्यादीचा जबाब नोंदवण्यासाठी आलेल्या पोलिसांकडून सुरुवातीला आरोपीचे नावे ऐकून टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप आहे यावेळी पोलिस कर्मचारी पो.हे.को.बक्कल नंबर १३०९ अल्ताफ अहमद शेख यांनी जखमीला फोन आल्याचा राग मनात धरून जखमी व त्यांच्या नातेवाईकांशी अभद्र वर्तन केल्याचेही सांगितले जाते प्रत्यक्षात जखमी फिर्यादी आरोपींची नावे स्पष्टपणे सांगत असतानाही संबंधित पोलिस कर्मचाऱ्याने जबाब नोंदवून घेण्यास नकार दिल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत त्यामुळे संतप्त झालेल्या जखमी व त्यांच्या नातेवाईकांनी संपूर्ण प्रकार मोबाईलमध्ये चित्रित करत पोलिसांना कायदेशीर काही चौकटीत प्रश्न विचारले या घटनेनंतर अखेर पोलिसांनी जबाब नोंदवून घेतला मात्र तोपर्यंत दवाखान्यातील इतर रुग्ण आणि नातेवाईकांसमोर हा सर्व प्रकार घडल्याने पोलिस प्रशासनाची प्रतिमा मलिन झाली आहे धक्कादायक बाब म्हणजे जखमी पेशंटला स्वतः बेडवरून उठून जबाब नोंदवून घेण्यासाठी पोलिसांच्या मागे रुग्णालयाच्या प्रवेशद्वारापर्यंत जावे लागले लोकशाही व्यवस्थेत कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या पोलिसांकडून अशा प्रकारची वागणूक मिळणे अत्यंत लाजिरवाणे असून या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण जगासाठी ज्ञानाचे प्रतीक, त्यांचे विचार जगाला प्रेरणा देत राहतील – धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

**देशाचे संविधानकर्ते, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानाचा अथांग सागर होते. ते केवळ एका समाजाचे नाही तर संपूर्ण जगासाठी ते ज्ञानाचे प्रतीक आहेत. महामानवाचे कर्तृत्व आणि विचार हे आपल्या सर्वांना प्रेरणा देणारे आणि प्रगतीकडे घेऊन जाणारे आहेत. देशाला स्वातंत्र्य आणि समतेचा जो महान संदेश त्यांनी दिला तोच संदेश आजही समाजाला एकत्र बांधून ठेवण्याचे काम करत आहे. त्यामुळे आपण सर्वांनी देखील बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा आपल्या कृतीत आणायला हवा, असे आवाहन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे.**



भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त परळी वैद्यनाथ शहरातील रेल्वे स्थानक परिसरातील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास धनंजय मुंडे यांनी सहकाऱ्यांच्या समवेत पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांना शुभेच्छा देताना धनंजय मुंडे यांनी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून देशवासी यांना भीम जयंतीच्या शुभेच्छा देत मोलाचा संदेश दिला आहे.

तद्नंतर धनंजय मुंडे यांनी परळी शहरातील भीम नगर, जगतकर गल्ली, रोडे गल्ली, साठेनगर, इंदिरानगर, भीमा नगर, मिलिंद नगर, उकळवेस, नागसेन नगर इत्यादी ठिकाणच्या बुद्ध विहार व ठिकठिकाणी आयोजित भीम जयंती कार्यक्रमानिमित्त भेटी देऊन महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत ठीक ठिकाणी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण केले. धनंजय मुंडे यांच्या हस्ते आजच्या शुभमुहूर्तावर मिलिंद नगर येथे उभारण्यात आलेल्या भव्य नालंदा बुद्ध विहाराचे यावेळी लोकार्पण देखील करण्यात आले, यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, बाजीराव धर्माधिकारी, प्रा. डॉ. विनोद जगतकर, रवींद्र गित्ते, श्रीकृष्ण कराड, अनंत इंगळे, यांसह नगरसेवक, पदाधिकारी आदी उपस्थित होते.



**बीड – भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत, भाजपा नेते अजय सवई, समता परिषद जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, शहराध्यक्ष नितीन राऊत.**

# शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवलेंसह मान्यवरांची महामानवाला आदरांजली





बीड । प्रतिनिधी


विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना जिल्हाधिकारी मा. विवेकजी जॉन्सन साहेब, पोलीस अधीक्षक मा. नवनीतजी कॉवत साहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. जतीनजी रहमान साहेब, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवक अध्यक्ष श्री. पप्पूजी कागदे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत आप्पा नवले माजी नगरसेवक श्री. राजू जोगदंड, श्री. अविनाश जोगदंड, श्री. बबनराव वडमारे, श्री. भगवानराव कांडेकर, श्री. अरुणजी भोले, श्री. अजय सवाई, श्री. गव्हाणे सर, श्री. नाना मस्के, श्री. विलास जोगदंड, नगरसेवक श्री. भारत कांबळे, माजी सरपंच श्री. आसाराम भाऊ गायकवाड, श्री. प्रेम तांगडे, श्री. पुरुषोत्तम वीर, श्री. मनोज वाघमारे, श्री. प्रतीक भोले, श्री. भागवतराव बादाडे, श्री. अशोकजी बेदरे, श्री. पोपटराव घाडगे सह आदी उपस्थित होते.

तसेच बीड आगार येथे श्री. बबनराव वडमारे मार्गदर्शक असलेले ◀◀ पान ३ वर


# पप्पू कागदेचा ढोल अन् आ.क्षीरसागरांचा डान्स

बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बीड शहरामध्ये अभिवादन सोहळा आयोजित केला यादरम्यान झालेल्या कार्यक्रमांमध्ये रिपाईचे जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी ढोल वाजवला त्यांच्या या तालात बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे पाय थरकले त्यांचा हा भन्नाट डान्स सर्व अनुयायांनी मनसोक्त पाहिला.



भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज सकाळी बीड शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता यावेळी ढोल ताशाच्या गजरामध्ये आनंद उत्सव साजरा करण्यात आला. याच दरम्यान रिपाईचे जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी गळ्यात ढोल अडकवला आणि तो वाजवण्यास सुरुवात केली याच दरम्यान अभिवादन करण्यासाठी आलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मात्र वेळेचा पुरेपूर फायदा आणि विनियोग करत ढोलाच्या या गजरात आणि त्या तालावर भन्नाट असा डान्स केला आमदार क्षीरसागर यांचा हा डान्स काही नवीन नाही ते शिवजयंती असो की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती असो यामध्ये अनेकांनी त्यांचा उत्साह पाहिलेला आहे मात्र आज अनेकांनी त्यांचा हा डान्स पाहिला यावेळी बीड शहरासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने अभिवादन करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या परिसरामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित होते



बीडचे पोलीस आमलदार राम यादव यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्यानंतर ते छत्रपती संभाजी नगरच्या बेगमपुरा पोलीस ठाण्यात रूजू झाले. छत्रपती संभाजी नगरचे बाळासाहेब कांगणे रांजनगाव, देवानंद पवार आदी मित्र परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



**माजलगाव:– भारतरत्न बोधिसत्व कैवारी शिल्पकार महामानव विश्वरत्न घटनाकार ज्ञानसूर्य ज्ञानाचे दिपस्तभ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ जयंती लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि सुंदरनगर कार्यालयात साजरी करण्यात आली यावेळी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड समवेत श्री अशोक पाटील, दासराव मोरे,विष्णु मोरे, सतोष लगड, दशरथ सहजराव, बाळु सावंत, दत्ता शेवाळे धनंजय सोळंके**

# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समाजाला दिशादर्शक –प्रभाकर बनसोडे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रभाकर बनसोडे बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थ, राजकीय, शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य हे समाजाला दिशादर्शक आहे.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप हे होते तर व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विवेक जोशी सर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व पंच परिवर्तन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्रशांत भानप यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. प्रास्ताविक दहावी प्रमुख श्रीमती पल्लवी कानडे, आभार दहावी सह प्रमुख अंकुश राठोड यांनी मानले. सुत्रसंचालन श्रीमती अपर्णा मुळे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली. कल्याण मंत्र विजयकुमार सोन्नर यांनी सांगितला. यावेळी पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# श्रीकिशन मुंदडा यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मोंढा भागातील सत्यनारायण मुंदडा यांचे मोठे भाऊ श्रीकिशन जगन्नाथजी मुंदडा यांचे मंगळवार दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजता दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ८५ वर्षाचे होते. त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात मोंढा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



बीड शहरातील मोंढा भागातील प्रसिद्ध व्यक्तिमत्व सत्यनारायण मुंदडा यांचे मोठे बंधू तथा कमलेश, पवन, पुष्पक यांचे चुलते तथा श्रीकांत मुंदडा यांचे वडील श्रीकिशन जगन्नाथजी मुंदडा हिवरेकर यांचे सकाळी नऊ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी सहा वाजता मोंढा भागातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार ,मोंढा परिसरातील व्यापारी, समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, राजकीय क्षेत्रातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा तीन मुली असा परिवार आहे.

# शिवाजीनगर पोलीस ठाण्यात महिलेचा आत्मदहनाचा प्रयत्न

बीड । प्रतिनिधी

प्लॉटिंग आणि जमिनीच्या व्यवसायामध्ये एकाने फसवणूक केली अनेक वेळा तक्रार करूनही न्याय मिळत नसल्याने आज चक्क एका महिलेने शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये येऊन अंगावर डिझेल पेट्रोल सारखे द्रव्य ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला यावेळी पोलीस कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे ही घटना कळली मात्र येथील अधिकारी कॅबिनमध्ये काय घडतंय हे पाहत होते

आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्व कर्मचारी बंदोबस्तात होते काही कर्मचारी पोलीस ठाण्यातही होते याच दरम्यान दुपारी एक महिला व तिचा पती न्याय मागण्यासाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये आले विशेषता त्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाली होती त्या संदर्भात त्यांना न्याय मिळत नव्हता अनेक वेळा विनंती करू नये न्याय मिळत नसल्याने त्यांनी चक्क शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या आवारातच अंगावर पेट्रोल डिझेल सारखे द्रव्य ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला दरम्यान या ठिकाणी कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी वेळीच हस्तक्षेप करत हा प्रकार रोखला मात्र त्यावेळी पोलीस ठाण्याच्या अधिकारीही हजर असताना केबिनमध्ये बसून सीसीटीव्हीवर काय घडत आहे हे पाहत होते मात्र ते स्वतःहून बाहेर आले नाहीत सदर महिलेला या घटनेपासून वाचवल्यानंतर अधिकाऱ्याच्या केबिनमध्ये घेऊन गेले असता कॅबिनमध्येच तिने घडलेली हकीगत सांगितली विशेषता अधिकारीच जर अशी भक्याची भूमिका घेत असतील तर न्याय कसा मिळणार असेही बोलले जात आहे दोन दिवसापूर्वीच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवर काही महिलांनी आंदोलन केले होते अनेक घटना शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडत असताना न्याय मिळत नाही म्हणून या घटना वारंवार घडत असल्याचे बोलवले जात आहे



**बीड : महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरातील पेठ बीड परिसरातील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# बीडमध्ये १ मे पासून राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञानाची मोठी पर्वणी

## विविध मान्यवरांच्या हस्ते होणार उद्घाटन; कृषीभूषण महेश बेदरे यांची माहिती

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, नव्या संशोधनाची माहिती आणि विविध कृषी उत्पादनांची ओळख व्हावी या उद्देशाने किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. याच परंपरेत यावर्षी प्रथमच बीड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहावरून १ते ५ मे दरम्यान बीड येथे भव्य राज्यस्तरीय किसान कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.



छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल (मल्टी पर्पज ग्राउंड) बीड येथील विस्तीर्ण मैदानावर ५ दिवस चालणाऱ्या या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याची माहिती कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक व कृषीभूषण महेश बेदरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

किसान कृषी विकास प्रतिष्ठान गेल्या १८ वर्षांपासून मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कृषी प्रदर्शनांचे आयोजन करत आहे. गेवराई, जालना, परभणी, हिंगोली यांसह अनेक ठिकाणी झालेल्या या प्रदर्शनांना शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आग्रहानुसार यंदा बीड येथे या कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कृषी प्रदर्शनात प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा ◀◀ पान ३ वर

# शेतकरी आत्महत्या; शवविच्छेदनासाठी नातेवाईकांची दोन तासांची प्रतीक्षा, आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बोरखेड येथील शेतकरी लक्ष्मण भानुदास क्षीरसागर (वय ५२) यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून मंगळवारी (दि.१४) दुपारी सुमारे २ वाजेच्या सुमारास शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.

घटनेची माहिती मिळताच लिंबागणेश पोलीस ठाण्याचे कर्मचारी गणेश परझने, मन्सुर शेख व अविनाश घुंगरड यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आला. मात्र, येथे




शवविच्छेदनासाठी आवश्यक साधनसामग्री व कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश आंधळे यांनी मृतदेह नेकनुर येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. या प्रक्रियेत सुमारे दोन तासांचा विलंब झाला. त्यामुळे मयताचे नातेवाईक रामदास क्षीरसागर, नवनाथ क्षीरसागर, दशरथ क्षीरसागर तसेच सरपंच सुनिल अनपट यांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागला. दरम्यान, लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनाची सुविधा नसल्याचा प्रकार यापूर्वीही अनेकदा घडल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या संदर्भात डॉ. गणेश ढवळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत नाराजी व्यक्त केली. यावर डॉ. गंडाळ यांनी अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये शवविच्छेदनासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची व साहित्याची कमतरता असल्याचे सांगितले. तसेच संबंधित प्रकरणात नेकनुर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# खोडसाळपणासाठी लिहिलेल्या पत्राची चौकशी झालीच पाहिजे; रुपाली चाकणकर २८ दिवसांनी बोलल्या, आरोपकर्त्यांना सवाल

**पुणे । प्रतिनिधी**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातप्रकरणावरुन सध्या आरोप प्रत्यारोप आणि राजकीय वातावरण तापलं आहे. दुसरीकडे एसआयटीकडून आरोपी खरातची कसून चौकशी सुरू असून ईडीनेही त्याच्या घरी, कार्यालयात छापेमारी केली. विशेष म्हणजे, कालच रुपाली चाकणकर यांच्या बहिण प्रतिभा चाकणकर यांची देखील एसआयटीने तब्बल १० तास चौकशी केली. मात्र, आपल्या नावे बनावट खाते उघडण्यात आले असून बँकेच्या व्यवहाराशी आपला कुठलाही संबंध नसल्याचं त्यांनी म्हटलं. त्यातच, आता तब्बल २८ दिवसानंतर रुपाली चाकणकर यांनी खरातप्रकरणी होत असलेल्या आरोपांवर सोशल मीडियातून आपली बाजू मांडली आहे.



रुपाली चाकणकर यांनी फेसबुक पोस्ट करत, बीडमधून आलेल्या पत्राची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. कुठल्याही पुराव्याच्या आधारे कुणीतरी लिहलेल्या पत्रावरुन आपणास आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केल्याची भावना त्यांनी सोशल मीडियातून व्यक्त केली. तसेच, एसआयटी तपास निष्पक्षपणे व्हावा म्हणूनच आपण मीडियापुढे आलो नाही, असेही त्यांनी म्हटले.

महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात आजतागायत अनेकांवर आरोप झाले, त्या आरोपांचे पुरावे माध्यमांनी सबंध महाराष्ट्राला दाखवले व आरोप करणाऱ्यांनीही पुराव्यानिशी आरोप केले. मात्र, आज २८ दिवस होत आहेत, माझ्यावर व माझ्या परिवारावर बेछूट व कपोलकल्पित आरोप हे फक्त हेतूपुरस्सर व बदनाम करण्यासाठी होत आहेत, हे वेळोवेळी समोर येत आहे. याबाबतीत आरोप करणाऱ्यांनी ना पुरावे दिले ना प्रसार माध्यमांनी ते मागितले. तसेच, निनावी पत्राबाबत जे कोणी आरोप करणारे आहेत त्यांनी सांगावे की ते पत्र त्यांच्यापर्यंत कसे आले? असा सवाल रुपाली चाकणकर यांनी उपस्थित केला आहे. एकप्रकारे त्यांनी कुणाचंही नाव न घेता बीडमधील महिला नेत्याच्या पत्रावरच भाष्य केल्याचं दिसून येतंय.

कोणतीही शहानिशा न करता केवळ आणि केवळ बदनामीचा कुटील डाव साध्य करण्यासाठी, पोलीस प्रशासनाला प्राप्त झालेलं एक निनावी पत्र माध्यमांकडे सुपूर्त करून दिवसभर चर्चासत्र घडवून आणले गेले,हे घडवून आणण्यामागे कुणाचे सौजन्य होते हे समोर आले पाहिजे. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनीही ज्या पत्रावर नाव व पत्ता नाही अशा निनावी पत्राला कायदेशीरदृष्ट्या काहीही अर्थ नसल्याने महत्त्व देता येत नाही, हे माध्यमांसमोर येत स्पष्ट केले आहे. तरीही, खोडसाळपणा करण्यासाठी हे पत्र कोणी लिहिले, कोठून आले याची चौकशी झालीच पाहिजे, अशी मागणी रुपाली चाकणकर यांनी केली आहे. यानिमित्ताने एक नवा चुकीचा पायंडा पाडला जात आहे. केवळ तर्कवितर्क, अंदाज, सुरस कथा आणि रंजक अफवा यांच्या आधारावर मला व माझ्या परिवाराला मानसिक त्रास दिला जातोय, बदनाम केले जात आहे ,हे अत्यंत खेदजनक आहे. मी पहिल्या दिवसापासून माझी ठाम आणि स्पष्टपणाने भूमिका मांडत आले आहे. खरात प्रकरणात कोणत्याही आर्थिक व्यवहारात, जमीन व्यवहारात व इतर कोणत्याही दुष्कृत्यात दुरान्वये आमचा संबंध नाही. शेवटी सत्य प्रखरतेने समोर येईलच, हा माझा दृढ विश्वास आहे. तरीही गेले काही दिवस प्रसारमाध्यमांमधून माझ्याविरोधी एकतर्फी येणाऱ्या बातम्या यावर मी प्रतिक्रिया किंवा कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. कारण, एसआयटी चौकशी करत असलेल्या तपास यंत्रणेला निष्पक्षपणे चौकशी करता यावी हाच हेतू आहे, असेही चाकणकर यांनी म्हटलं आहे.

# पुण्यात आंबेचोरांचा सुळसुळाट; रात्रीच्या अंधारात १ लाखांच्या पेट्या गायब

**पुणे । प्रतिनिधी**



उन्हाळा सुरू होताच फळांचा राजा असलेल्या 'आंब्याची' लगबग वाढते. यंदा अवकाळी पाऊस झाल्यामुळे आंब्याच्या उत्पादनावर परिणाम झाल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळे यंदा आंबा महाग असल्याचं दिसून येत आहे. अशी पार्श्वभूमी असताना पुण्यात आंबेचोरांचा सुळसुळाट झाला आहे. पुण्यातील कोंढवा बुद्रुक परिसरातील येवलेवाडी येथे एक धक्कादायक चोरीची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्यांनी एका आंब्याच्या दुकानातून तब्बल ३३ पेटी आंबे पळवून नेल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही चोरी ११ एप्रिल रोजी रात्री २ ते सकाळी ६ च्या दरम्यान घडली. कात्रज-कोंढवा रोडवर एका प्रसिद्ध हॉटेलच्या शेजारी आंब्याचं दुकान थाटण्यात आलं होतं. विक्रीसाठी आणलेले आंबे सुरक्षित राहावेत म्हणून व्यापाऱ्याने या मोकळ्या जागेत कापडी मांडव घातला होता. मात्र, रात्रीच्या शांततेचा फायदा घेत चोरट्यांनी दुकानाच्या मागील बाजूने प्रवेश केला. चोरट्यांनी अत्यंत शिताफीने मांडव फाडला आणि आत प्रवेश करून तिथे ठेवलेल्या १ लाख ८ हजार रुपये किमतीच्या तब्बल ३३ पेटी आंब्यांवर डल्ला मारला. धक्कादायक बाब म्हणजे, या परिसरात दुकान लावल्यानंतर चोरी होण्याची ही दुसरी वेळ आहे. वारंवार होणाऱ्या या चोऱ्यांमुळे स्थानिक व्यापारी आणि विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. एकाच ठिकाणाहून दोनदा माल चोरीला गेल्याने, ही चोरी कोणी ओळखीच्या व्यक्तीने किंवा पाळत ठेवून केली आहे का? असा संशय आता व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी संबंधित व्यापाऱ्याने येवलेवाडी पोलीस चौकीत तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास वेगाने सुरू केला आहे. पोलीस परिसरातील हॉटेल आणि मुख्य रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासत आहेत. चोरीच्या पद्धतीवरून हा प्रकार सराईत गुन्हेगारांचा आहे की स्थानिक टोळीचा, याचा शोध पोलीस घेतला जात आहे. सध्या पुण्यात आंब्याचे भाव कडाडलेले असताना, अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर आंब्यांची चोरी होणे ही चर्चेची बाब ठरली आहे. येवलेवाडी पोलीस या 'आंबे चोरांचा' छडा लावण्यात यशस्वी ठरतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खडकवासला कालव्यावरील झोपडपट्ट्यांवर हातोडा; ५० अभियंत्यांची फौज तैनात

**खडकवासला । प्रतिनिधी**

खडकवासला धरण ते फुरसुंगी दरम्यान असलेल्या कालवा परिसरात झालेली अतिक्रमणे काढण्यासाठी जलसंपदा विभागाने कंबर कसली आहे. येथील झोपडपट्ट्यांना नोटिसा बजावल्या असून कालव्याच्या प्रत्येक पाच किलोमीटरसाठी चार अभियंते असे अतिरिक्त ५० अभियंते या मोहिमेसाठी नियूक्त केले आहेत. तसेच कालव्याच्या परिसरातील झोपडपट्ट्यांची अतिक्रमणे काढल्यानंतर पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी तेथे सीमा भिंत उभारण्याचा निर्णय घेतला आहे. खडकवासला धरण परिसरातील वाढत्या अतिक्रमणांबाबत तक्रारी आल्यानंतर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी याची गंभीर दखल घेत ही अतिक्रमणे तातडीने काढावीत असे आदेश जलसंपदा विभागाला दिले होते. त्यानुसार गेल्या महिन्यांपासून अतिक्रमण काढण्याची मोहीम विभागाने हाती घेतली होती. यापूर्वी धरण परिसरातील १०० अतिक्रमणे काढण्यात आली असून कालव्यावरील २५ हेक्टरपैकी पाच हेक्टर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आल्याची माहिती विभागाने दिली. ही मोहीम आणखी कडक करण्याच्या सूचना मंत्र्यांनी विभागाला दिल्या आहेत. खडकवासला धरणातून फुरसुंगीपर्यंत असलेला कालवा पुणे शहरातून जातो. शहर व परिसरात कालव्याच्या भागात अनेक



ठिकाणी अतिक्रमणे झाली आहे. त्यामध्ये झोपडपट्ट्यांची संख्या जास्त आहे. या सर्व झोपडपट्ट्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत .जलसंपदा विभागाने अतिक्रमणांची पाहणी करण्यासाठी ड्रोन सर्व्हे करण्यात आले होते. अतिक्रमणांमध्ये रिसॉर्ट हॉटेल तसेच घरांचाही समावेश असल्याचे दिसून आले होते.

# येरवड्यात स्कॉर्पिओतून विदेशी दारुची तस्करी उघडकीस; पोलीसांनी आवळल्या मुसक्या

**पणे । प्रतिनिधी**


स्कॉर्पिओ गाडीतून विदेशी दारूची तस्करीचा डाव लक्ष्मीनगर पोलिसांनी उघडकीस आणला आहे. याप्रकरणी संबंधिताला येरवड्यातील सादलबाबा चौकातून ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्याकडून गाडीसह तब्बल २ लाखांची विदेशी दारू, गाडी, मोबाइल असा मिळून २३ लाख ३१ हजारांचा ऐवज जप्त केला आहे. अंग्रेजसिंग पुरणसिंग गील (वय ३८ वर्ष, रा. रामनगर बोपखेल) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी त्याच्याविरूद्ध लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

अवैध व्यावसायिकांविरूद्ध कठोर कारवाईच्या आदेशानुसार १४ एप्रिलला लक्ष्मीनगर पोलीस हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी पोलीस अमलदार भिमराव कांबळे, अमोल वायाळ यांना मोटारीतून विदेशी दारूची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस उपायुक्त चिलुमुला रजनिकांत, एसीपी सुनिल जैतापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने सादलबाबा चौकात सापळा रचला. संशयित वाहन चालकाला अडवून त्याच्या वाहनाची (एम.एच.१४ एल.पी. ७४७४) तपासणी केली. त्यावेळी गाडीच्या डिकीत २ लाखांची विदेशी दारू, मोबाइल, असा २३ लाख ३० हजारांचा ऐवज जप्त केला. आरोपीने यापुर्वी अशाप्रकारे दारूची तस्करी केली आहे का? त्याने विदेशी दारूचा साठा कोठून मिळवला, यामध्ये इतर आरोपींचा सहभाग आहे का? यादृष्टीने तपास केला जात असल्याची माहिती लक्ष्मीनगर पोलिसांनी दिली आहे. ही कामगिरी पोलीस आयुक अमितेश कुमार, सहआयुक्त रंजन कुमार शर्मा, अपर आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त

# रस्ता दिला नाही म्हणून थेट अंगावर घातली कार; एकाचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

मद्यधुंद चालकाने खासगी बसवरील चालकाला धडक देऊन त्याला फरफटत नेत खाली पाडल्यानंतर त्याच्या अंगावरून गाडी घातल्याने मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार उरुळी देवाची येथे घडला आहे. सागर बाळासाहेब सायकर (रा. शेवाळवाडी) असे अपघातात मृत्यू झालेल्या ट्रॅव्हल्स चालकाचे नाव आहे. याबाबत विजय तानाजी शिर्के (४१, रा. सातवाडीस, हडपसर) यांनी फुरसुंगी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार कार चालक कृष्णा गोपाळ कोईलवाड (३०, रा. ब्रोथी, जि. लातूर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार आणि मयत यांच्या ट्रॅव्हल्स बस आहेत. ते चालक म्हणून काम करीत होते. दोन ट्रॅव्हल्स घेऊन ते १२ एप्रिल रोजी रात्री साडेबारा वाजता वडकी येथून काही महिलांना घेऊन अक्कलकोट येथे जाणार होते. हडपसर-सासवड मार्गावर दोन्ही ट्रॅव्हल्समध्ये एक एर्टिगा कार येऊन जागा देत नव्हती.




त्यामुळे तक्रारदार यांनी ट्रॅव्हल्स बस थांबवून मागून येणाऱ्या एर्टिगा कारला थांबवून काय अडचण आहे, असे विचारले. यावेळी मयत सायकर आणि अभिजित जमदाडे येथे उभे होते. त्यावेळी दारूच्या नशेत असणाऱ्या एर्टिगा कार चालकाने सायकर यांच्या अंगावर गाडी घातली आणि त्यांना फरफटत नेले. ब्रेक लावल्याने सायकर खाली पडले. त्यानंतर त्यांच्या अंगावरून पुन्हा कार घालून त्यांना गंभीर जखमी केले. सायकर यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक जाधव करीत आहेत.

# प्रभाग समिती निवडणूक लांबणीवर ? नगरविकासने मागविला अहवाल

**पुणे । प्रतिनिधी**



महापालिकेने केलेल्या क्षेत्रीय कार्यालय व प्रभाग समिती पुनर्रचनेत त्रुटीं असल्याचा आरोप करत समिती रचनेला स्थगिती देण्याची मागणी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे. या मागणीनुसार तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश नगरविकास विभागाने ७ एप्रिल रोजी पालिकेला दिले आहेत. यामुळे, २१ एप्रिल रोजी होणाऱ्या क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समिती अध्यक्षांची निवड लांबणीवर पडण्याची स्पष्ट चिन्हे आहेत. क्षेत्रीय कार्यालये व प्रभाग समित्या या मिनी महापालिका म्हणून ओळखल्या जातात. त्याची निवडणूक २१ एप्रिल रोजी होणार होती. त्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाने अप्पर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांची पीठासन अधिकारी म्हणून नियुक्तीही केली आहे. महापालिकेत राष्ट्रवादीचे दुसऱ्या क्रमांकाचे २७ नगरसेवक असूनही त्यांना क्षेत्रीय कार्यालय पुनर्रचनेनंतर एकाही प्रभाग समितीचे अध्यक्षपद मिळणार नाही.

दुसरीकडे काँग्रेसचे १५ सदस्य असतानाही त्यांना एक समिती मिळणार आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अस्वस्थता असून पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आपल्या भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे व्यक्त केल्या. त्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी वरील पत्र मुख्यमंत्र्यांना पाठवले आहे.पालिकेने केलेल्या १५ क्षेत्रीय कार्यालये आणि परिसीमा विभागांच्या पुनर्रचनेमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत. या बाबी उपमुख्यमंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात नमूद केल्या आहेत. तसेच जनहिताच्या दृष्टिने सदर प्रभाग रचनेस स्थगिती देऊन नवीन प्रभाग रचना करण्याचा संबंधितांना आदेश द्यावा अशीही मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# तहसीलदार पदोन्नतीवरुन वाद; बावणकुळे यांचे आश्वासन

**लोणी काळभोर । प्रतिनिधी**

महसूल विभागातील तहसीलदार पदोन्नती प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. तहसीलदार पदोन्नती प्रक्रियेत कोणावरही अन्याय होणार नाही, पदोन्नती पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने केली जाईल आणि पुणे महसूल विभागातील कोणत्याही तहसीलदारावर अन्याय होऊ दिला जाणार नाही, असे त्यांनी सुतोवाच केले आहे. हवेली तालुक्यातील लोणी कंद येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान अंतर्गत समाधान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी वरिल सुतोवाच केले . या शिबिराचे उद्घाटन मंत्री बावणकुळे यांच्या हस्ते करण्यात आले.



राज्य शासनाने नोव्हेंबर २०२५ मध्ये ११२ तहसीलदारांना उपजिल्हाधिकारी पदावर पदोन्नती दिली. मात्र या प्रक्रियेत पुणे महसूल विभागातील सन २०१३-१४ मध्ये तहसीलदार म्हणून पदोन्नत झालेल्या २० अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला नाही. विशेष म्हणजे, या अधिकाऱ्यांपेक्षा नंतर म्हणजे २०१४ मध्ये थेट सेवेत दाखल झालेल्या काही तहसीलदारांना देखील पदोन्नती मिळाल्याने असंतोष वाढला आहे. तसेच, २००४ साली नायब तहसीलदार म्हणून सेवेत रुजू झालेले हे अधिकारी असून त्यांच्या बॅचमधील इतर विभागातील सर्व अधिकारी उपजिल्हाधिकारी म्हणून पदोन्नत झालेले आहेत. याशिवाय २००७ बॅचमधील काही अधिकाऱ्यांनाही पदोन्नती मिळाल्याने पुणे विभागातील अधिकाऱ्यांवर अन्याय झाल्याची भावना अधिक तीव्र झाली आहे. या २० तहसीलदारांचा सेवाज्येष्ठता यादीत योग्य क्रमांकावर समावेश न झाल्यामुळे त्यांना पदोन्नतीपासून वंचित राहावे लागले आहे. दरम्यान, शासन पुन्हा सुमारे ५० तहसीलदारांना उपजिल्हाधिकारी म्हणून पदोन्नती देण्याच्या तयारीत असून त्यातही या अधिकाऱ्यांचा समावेश नसल्याचे समोर आले असल्याची खात्रीलायक माहिती आहे. यामुळे भविष्यात पुणे महसूल विभागातील पदोन्नत तहसीलदार उपजिल्हाधिकारी पदावर न जाता सेवानिवृत्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वंचित तहसीलदारांनी वेळोवेळी शासनाकडे निवेदने सादर करून आपली बाजू मांडली आहे. मात्र अद्याप त्यांच्या मागण्यांवर कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे आमचा समावेश केल्याशिवाय पुढील पदोन्नती प्रक्रिया राबवू नये, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी आज केलेले सुतोवाच महत्त्वाचे मानले जात आहे. त्यांनी स्पष्ट केले की, पदोन्नती प्रक्रियेत पारदर्शकता राखली जाईल आणि कोणत्याही अधिकाऱ्यावर अन्याय होणार नाही याची शासन पूर्ण खबरदारी घेईल तहसीलदार पदोन्नतीचा प्रश्न आता केवळ प्रशासकीय न राहता संवेदनशील बनला आहे. पुणे महसूल विभागातील वंचित अधिकाऱ्यांच्या अपेक्षा आणि शासनाचे आश्वासन यामुळे पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नवीन अभ्यासक्रमासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण ४ मेपासून सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद अर्थात विद्या प्राधिकरणाच्या वतीने दुसरी, तिसरी आणि चौथीच्या शिक्षकांसाठी नवीन अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून लागू होणाऱ्या नवीन अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. ४ मेपासून सुरू होणाऱ्या या प्रशिक्षणासाठी शिक्षकांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.



नवीन शैक्षणिक वर्ष १५ जून २०२६ पासून सुरू होत आहे. त्यापूर्वी सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. हे प्रशिक्षण राज्य, जिल्हास्तर आणि तालुकास्तर अशा तीन टप्प्यांत पार पडणार आहे. राज्यस्तरासाठी ४ ते ७ मे २०२६ रोजी मराठी व उर्दू माध्यमासाठी, जिल्हास्तर ११ ते १४ मे दरम्यान मराठी व अन्य माध्यमांसाठी, तर तालुकास्तर प्रशिक्षण १८ ते ३० मे दरम्यान मराठी व अन्य माध्यमांसाठी हे प्रशिक्षण होणार आहे. उर्दू माध्यमासाठी हे प्रशिक्षण केवळ राज्य आणि जिल्हा अशा दोनच स्तरांवर आयोजित केले जाणार आहे. सहसंचालकांनी सर्व प्रादेशिक विद्या प्राधिकरण आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांना या संदर्भात जिल्हास्तर सुलभकांची नावे त्वरित कळविण्याचे आदेश दिले आहेत. नवीन अभ्यासक्रम वर्गात शिकवताना शिक्षकांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत आणि अध्यापन प्रक्रिया सुलभ व्हावी, हा या प्रशिक्षणाचा मुख्य हेतू असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. इयत्ता दुसरीच्या शिक्षकांसाठी ३ दिवस, तर तिसरी आणि चौथीच्या शिक्षकांसाठी ४ दिवसांचे प्रशिक्षण निश्चित केले आहे. मराठी, उर्दू आणि इतर सर्व माध्यमांच्या शिक्षकांसाठी स्वतंत्र किंवा समन्वयाने प्रशिक्षणाची सत्रे घेतली जातील. विशेष म्हणजे, दुसरीच्या प्रशिक्षणाचा कालावधी कमी असला, तरी प्रशिक्षणाची सुरुवात मात्र सर्व वर्गांसाठी एकाच तारखेला होणार आहे.

# लता मंगेशकर हॉस्पिटलचं नाव बदलणार, आशा भोसलेंच्या नावाचाही समावेश, हृदयनाथ मंगेशकरांची मोठी घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

मंगेशकर कुटुंबीयांकडून पुण्याजवळ उभारल्या जाणाऱ्या भव्य हॉस्पिटलसंदर्भात हृदयनाथ मंगेशकर यांनी मोठी घोषणा केली आहे. आधी या हॉस्पिटलचे नियोजित नाव लता मंगेशकर हॉस्पिटल असं होतं. त्यामध्ये आता बदल करून नवं नाव हे लता आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस असं ठेवण्यात येणार असल्याची माहिती हृदयनाथ मंगेशकर यांनी दिली. १६ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत या हॉस्पिटलचं भूमिपूजन होणार असल्याची माहिती हृदयनाथ मंगेशकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या हॉस्पिटलला आधी केवळ लता मंगेशकर यांचं नाव देण्याचा निर्णय झाला होता. मात्र अलीकडेच आशा भोसले यांच्या निधनानंतर त्यांच्या नावाचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे या संस्थेचं नाव आता 'लता आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' असं ठेवण्यात येणार आहे. पुण्याजवळील नांदोशी येथे सुमारे ४० एकर जागेत हे हॉस्पिटल उभारलं जाणार आहे. या रुग्णालयात विविध वैद्यकीय विभाग असतील. तसेच रुग्णांच्या नातेवाईकांसाठी राहण्याची सोय म्हणून धर्मशाळाही उभारली जाणार आहे. ही संकल्पना मंगेशकर कुटुंबीयांनी समाजोपयोगी कामाचा भाग म्हणून पुढे आणली असून आधुनिक सुविधा असलेलं हे रुग्णालय उभारण्याचा त्यांचा मानस आहे.हृदयनाथ मंगेशकर यांनी सांगितलं की, या कार्यक्रमासाठी आशा मंगेशकर स्वतः उपस्थित राहणार होत्या. मात्र अचानक हृदयविकाराचा झटका आल्यामुळे त्यांचं निधन झालं. त्या पार्श्वभूमीवर त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून हॉस्पिटलच्या नावात त्यांचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. हृदयनाथ मंगेशकर म्हणाले की, दुःख विसरून कर्तव्य पार पाडावं ही लतादीदींची शिकवण आहे. त्यामुळेच आम्ही हा प्रकल्प पुढे नेत आहोत.

दरम्यान, भूमिपूजन सोहळ्यासाठी उपस्थित राहणाऱ्यांनी पांढरे कपडे परिधान करून यावं, असं आवाहनही करण्यात आलं आहे.

cmyk